सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ४९ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ऑनलाईन व्यवहारात वाढ

नवी दिल्ली : भारतात नोटबंदीनंतर सुरू झालेली डिजिटल क्रांती आता एका अशा सर्वोच्च टप्प्यावर पोहोचली आहे, जिथे सर्वसामान्य नागरिक खिशात पाकीट किंवा कॅश ठेवणे विसरूनच गेले आहेत. २०२६ च्या मे महिन्यात, देशातील यूपीआय व्यवहारांनी एक नवीन विक्रम नोंदवला आहे. मे महिन्यात यूपीआय व्यवहारांचे एकूण मूल्य ३ टक्क्यांनी वाढून २९.९० लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहेत. जे एप्रिल महिन्यात २९.०३ कोटी रुपये होते. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात नोटबंदीचे पर्व वेगाने विस्तारताना दिसत आहे.

## विमान अर्ध्या रस्त्यातून माघारी

वॉशिंग्टन: अमेरिकेच्या न्यूयॉर्कहून स्पेनच्या पाल्मा डी मयोर्काला निघालेलं युनायटेड एअरलाइन्सचं विमान अर्ध्या रस्त्यातून माघारी परतलं. प्रवाशानं ब्लूटूथ सुरू करताच पायलट घाबरले. सुरक्षा यंत्रणांनी संभाव्य धोका लक्षात घेत विमानाला परत बोलावलं. यानंतर सगळ्या प्रवाशांची पुन्हा तपासणी केली गेली. या विमानात १९० प्रवासी आणि १२ कर्मचारी होते.

## क्रेडिट कार्डाच्या नियमात बदल

मुंबई : देशभरात अनेक महत्त्वपूर्ण आर्थिक बदल लागू झाले आहेत, ज्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या खिशावर आणि त्यांच्या दैनंदिन आर्थिक निर्णयांवर परिणाम होत आहे. बँकिंग, गुंतवणूक आणि क्रेडिट कार्ड नियमांमध्ये अनेक बदल करण्यात आले आहेत. क्रेडिट कार्ड नियमांमधील हे बदल सर्वाधिक चर्चेत आहेत, कारण त्यांचा लाखो कार्डधारकांच्या खर्चावर आणि लाभांवर थेट परिणाम होईल.अनेक बँकांनी त्यांच्याक्रेडिट कार्डवरील रिवॉर्ड पॉइंट्सशीसंबंधित नियमांमध्ये सुधारणा केली आहे.

## मुंबईला ड्रग्ज मुक्त करणार

मुंबई : गोरेगाव येथील नेस्को संकुलात आयोजित एका संगीत कार्यक्रमादरम्यान (कॉन्सर्ट) अंमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे (ड्रग्ज) झालेल्या मृत्यूच्या घटनेनंतर राज्य सरकारने मुंबईला ड्रग्जमुक्त करण्यासाठी विशेष उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या समितीच्या अध्यक्षपदाची धुरामुंबई उपनगराचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. या उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून मुंबईत वर्षभर '१२ कलमी विशेष कार्यक्रम' राबविला जाणार असून, येत्या २१ जूनपासून या मोहिमेची अंमलबजावणी सुरू होणार आहे.

## तळीरामात हाणामारी

वाशिम : वाशिम शहरालगतच्या काटा रोडवरील एका वाईन बारसमोर मध्यरात्री दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. सुरुवातीला दोन तरुणांमध्ये झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर काही वेळातच मोठ्या राड्यात झाले. यावेळी दोन्ही गटातील तरुणांनी एकमेकांवर काठ्या, फळ्या आणि लाथाबुक्क्यांनी हल्ला चढविल्याचे दिसून आले. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## पोलिसाने वाचविले प्राण

मुंबई : मुंबई पोलीस नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि मदतीसाठी सदैव तत्पर असल्याचे आणखी एक उदाहरण समोर आले आहे. मरीन ड्राइव्ह परिसरात पोलिसांच्या सतर्कतेमुळे आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्यामुळे ४६ वर्षीय महिलेचा जीव वाचवण्यात यश आले. ३१ मे रोजी घडलेल्या या घटनेत संबंधित महिला समुद्रात उतरल्याचे निदर्शनास आले होते.

# २०४७ पर्यंत 'एसटी'च्या सर्व बस इलेक्ट्रिक होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याचे निर्देश



तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा चेहरामोहरा बदलून ती पूर्णपणे पर्यावरणपूरक आणि आधुनिक करण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलली आहेत. 'विकसित महाराष्ट्र' संकल्पनेचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यातील सर्वच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक (ई-बसेस) करण्यात येणार असून, सन २०४७ पर्यंत १०० टक्के 'एसटी' ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरीत केला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली.

या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टाच्या अनुषंगाने राज्यात ई-बसेससाठी आवश्यक असलेल्या चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याच्या कामाला तीव्र गती देण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' निवासस्थानी एसटी महामंडळाच्या ई-बसेससंदर्भातील आढावा बैठक पार पडली.

या बैठकीला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे व उपसचिव चेतन निकम प्रामुख्याने उपस्थित होते.एसटी महामंडळाच्या ताफ्याचे ई-बसेसमध्ये रूपांतर करण्यासाठी सरकारने निश्चित कालमर्यादा आखली आहे. यानुसार सन २०२९ पर्यंत ५० टक्के, २०३५ पर्यंत ८० टक्के, तर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात म्हणजेच २०४७ पर्यंत १०० टक्के ताफा पूर्णपणे इलेक्ट्रिक केला जाईल. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या.


त्यानुसार, पर्यावरणपूरक ई-बसेस ज्या मार्गांवर चालवल्या जाणार आहेत, त्या मार्गांचा अभ्यास करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाची मदत घेतली जावी. पुरवठादाराकडून नवीन ई-बस प्राप्त होताच पुढील ७ दिवसांत तिचे तांत्रिक निरीक्षण व चाचणी पूर्ण करावी. ज्या प्रमुख मार्गांवर सध्या खाजगी बसेस मोठ्या प्रमाणावर धावतात, त्या मार्गांचा विशेष अभ्यास करून तिथे प्रवाशांसाठी एसटीच्या ई-बसेसचा सक्षम पर्याय तयार ठेवावा, असे निर्देश देण्यात आले.

राज्य शासनाच्या विद्यमान ई-वाहन धोरणांतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले जात आहे. या धोरणानुसार, १ हजार ५०० ई-बसेसना बसच्या मूळ किमतीच्या १० टक्के किंवा कमाल २० लाख रुपये इतके आर्थिक अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील सार्वजनिक वाहतूक अधिक शाश्वत आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी हे धोरण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. -

सध्या एसटी महामंडळ जीसीसी मॉडेलवर ५ हजार १५० ई-बसेसचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील सर्वसामान्य प्रवाशांना आगामी काळात अधिक आधुनिक, आरामदायी आणि पूर्णपणे प्रदूषणमुक्त प्रवासाची उत्तम सुविधा उपलब्ध होईल, असा विश्र्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

# ' डेक्कन क्वीन 'चा ९७ वा वाढदिवस

## पुणे-मुंबईच्या भावनिक नात्याचा ऐतिहासिक उत्सव



तभा वृत्तसंस्था

पुणे: भारतीय रेल्वेच्या इतिहासातील सोनेरी पान आणि पुणे-मुंबईचा भावनिक दुवा असलेली 'दख्खनची राणी' म्हणजेच डेक्कन क्वीन १ जून २०२६ रोजी आपल्या प्रवासाचा ९७ वा टप्पा पार केला.

१ जून १९३० रोजी 'ग्रेट इंडियन पेनिनसुलर रेल्वे'ने सुरू केलेली ही देशातील पहिली डिलक्स ट्रेन सुरुवातीला 'ब्लू बर्ड बेबी' म्हणून ओळखली जात असे. इंग्लंडमध्ये बनवलेले डबे आणि कल्याण-पुणे मार्गावरून सुरू झालेला प्रवास पुढे 'सीएसएमटी'पर्यंत विस्तारला; यात दादर, शिवाजीनगरसारखे थांबे जोडले गेले.

देशात पहिल्यांदा डायनिंग कार (३२ आसनी आधुनिक हॉटेल सोय) आणि १५ ऑगस्ट २०२१ पासून विस्टाडोम कोच जोडणारी ही मानाची ट्रेन आहे. आज सोमवारी (दि. १ जून) सकाळी ६.४५ वाजता पुणे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक १ वररेल्वे प्रवासी ग्रापच्या अध्यक्षा हर्षा शहा यांच्या नियोजनाखाली आणि कोहिनूर ग्रापचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा झाला. सकाळी ७ वाजता फुलांनी सजवलेल्या इंजिनला मानवंदना देऊन ७.१५ वाजता ही राणी मुंबईकडे रवाना झाली.

# ब्रह्मोस क्षेपणास्त्रावर भारताची मोठी झेप!

## व्हिएतनामनंतर इंडोनेशियाही खरेदीसाठी उत्सुक




वृत्तसंस्था

नवी दिल्ली :भारताच्या अत्याधुनिक आणि जगातील सर्वात वेगवान क्रूझ क्षेपणास्त्रांपैकी एक मानल्या जाणाऱ्या 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र प्रणालीला आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी मागणी वाढत आहे. भारताने व्हिएतनामसोबत ब्रह्मोस विक्रीचा करार केला असून, इंडोनेशियासोबतही अशीच चर्चा अंतिम टप्प्यात असल्याची माहिती संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी दिली आहे.

सिंगापूर येथे झालेल्या 'शांग्री-ला डायलॉग' या जागतिक सुरक्षा परिषदेत बोलताना त्यांनी या कराराला अधिकृत दुजोरा दिला. व्हिएतनामसोबतचा करार पूर्ण झाला असून त्यावर स्वाक्षरीही झाली आहे, मात्र त्याची सार्वजनिक घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.भारताचा वाढता संरक्षण निर्यात प्रभाव अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, भारत केवळ विश्र्वासू आणि मैत्रीपूर्ण देशांनाच अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान पुरवतो. त्यामुळे आशियाई देशांमध्ये भारताच्या संरक्षण उद्योगाबाबत विश्र्वास अधिक दृढ होत आहे.

यापूर्वी फिलिपिन्स हा ब्रह्मोस क्षेपणास्त्र प्रणाली खरेदी करणारा पहिला परदेशी देश ठरला होता. सुमारे ३७५ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ३,१०० कोटी रुपये) किमतीचा हा करार २०२२ मध्ये झाला होता. त्यानंतर आता व्हिएतनाम आणि इंडोनेशिया हे देशही भारताच्या संरक्षण उत्पादनाकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत.जागतिक पातळीवरील वाढत्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्र्वभूमीवर संरक्षण पुरवठा साखळी मजबूत करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. कोणत्याही एका देशावर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही वर्षांत भारताने संरक्षण उत्पादन क्षेत्रात मोठी प्रगती केली असून खासगी कंपन्यांचा सहभागही लक्षणीय वाढला आहे. सध्या देशातील एकूण संरक्षण उत्पादनात सरकारी कंपन्यांचा वाटा सुमारे ७२ टक्के आहे, तर उर्वरित वाटा खासगी क्षेत्राचा आहे. आज भारत केवळ संरक्षण आयातदार देश राहिला नसून, तो आता एक विश्र्वासार्ह संरक्षण निर्यातदार म्हणून उदयास येत आहे. क्षेपणास्त्र प्रणाली, लढाऊ विमाने आणि युद्धनौका निर्मितीमध्ये आत्मनिर्भरतेकडे भारताची वाटचाल वेगाने सुरू असल्याचे या परिषदेत अधोरेखित करण्यात आले.

# मे महिन्यात जीएसटी महसूल संकलन १.९४ लाख कोटी रुपयांच्या पुढे




वृत्तसंस्था

नवी दिल्ली : देशाच्या वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनात वाढ नोंदवण्यात आली आहे. मे महिन्यात जीएसटी महसूल संकलन ३.२ टक्क्यांनी वाढून १.९४ लाख कोटी रुपयांहून अधिक झाले आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात एकूण जीएसटी महसूल संकलन १.८८ लाख कोटी रुपये होते.

जीएसटी महासंचालनालयाने सोमवारी जारी केलेल्या आकडेवारीनुसार, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात झालेली सुधारणा तसेच आयातीवरील कर संकलनात सातत्याने झालेली वाढ यामुळे जीएसटी महसूल संकलनात ही वाढ झाली आहे. आकडेवारीनुसार, मे महिन्यात देशांतर्गत व्यवहारांमधून केंद्रीय जीएसटी (सीजीएसटी) संकलन ३७,३९७ कोटी रुपये, राज्य जीएसटी (एसजीएसटी) ४५,१४३ कोटी रुपये आणि एकात्मिक जीएसटी (आयजीएसटी) ५१,९९० कोटी रुपये इतके राहिले. आकडेवारीनुसार, या कालावधीत करपात्र वस्तूंच्या पुरवठ्यात २६.९ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली, जी देशांतर्गत मागणीचे प्रतिबिंब दर्शवते. सेवा क्षेत्रात ही वाढ २२.२ टक्के राहिली असून, ती देशांतर्गत उपभोगातील मजबुती दर्शवते. त्याचप्रमाणे, आयातीमधून मिळणारे आयजीएसटी संकलन १९.१ टक्क्यांनी वाढून मे महिन्यात ५९,६५४ कोटी रुपये झाले, जे औद्योगिक क्षमतेच्या विस्ताराचे संकेत मानले जात आहेत. याशिवाय, या कालावधीत जीएसटी परतावा (रिफंड) २.६ टक्क्यांनी वाढून २७,२८१ कोटी रुपये झाला. परताव्याचे समायोजन केल्यानंतर मे महिन्यात निव्वळ जीएसटी महसूल संकलन ३.३ टक्क्यांनी वाढून सुमारे १.६७ लाख कोटी रुपये राहिले. यापूर्वी एप्रिल महिन्यात जीएसटी महसूल संकलन ८.७ टक्क्यांनी वाढून २.४३ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी उच्चांकावर

# दुबईहून आलेल्या प्रवाशांकडून ४.१९ कोटींचे सोने जप्त

तभा वृत्तसेवा

मुंबई :छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने सोन्याच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करत दुबईहून आलेल्या दोन प्रवाशांकडून तब्बल ४.१९ कोटी रुपये किमतीचे २.६ किलो सोने जप्त केले आहे.

या कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय तस्करीच्या जाळ्याचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला असून, या प्रकरणामागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणांनी मोहीम सुरू केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई सीमाशुल्क विभागाच्या हवाई गुप्तचर पथकाला दुबईहून मोठ्या प्रमाणात सोने तस्करी करून भारतात आणले जाणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी विमानतळाच्या आगमन विभागात सापळा रचून संशयित प्रवाशांवर नजर ठेवली.दुबईहून मुंबईत दाखल झाल्यानंतर संकेत गडावे (कोल्हापूर) आणि प्रतीक जाधव (सांगली) हे दोघे 'ग्रीन चॅनेल'मधून बाहेर पडण्याच्या तयारीत असताना सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतले. सुरुवातीला दोघांनीही आपल्याकडे कोणतीही संशयास्पद वस्तू नसल्याचा दावा केला. मात्र अधिकाऱ्यांच्या कसून चौकशीनंतर आणि वैयक्तिक झडतीदरम्यान धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

सीमाशुल्क कायदा १९६२ अंतर्गत घेण्यात आलेल्या झडतीमध्ये दोन्ही प्रवाशांच्या कपड्यांमध्ये काळ्या रंगाच्या पिशव्या लपवून ठेवण्यात आल्याचे आढळले. या पिशव्यांमध्ये मेणाच्या स्वरूपात सोन्याची धूळ लपविण्यात आली होती. तपासानंतर या सोन्याचे एकूण वजन सुमारे २.६ किलो असल्याचे निष्पन्न झाले.प्राथमिक चौकशीत आरोपींनी दुबईतील एका व्यक्तीकडून हे सोने स्वीकारल्याची कबुली दिली आहे. सीमाशुल्क विभागाची दिशाभूल करून हे सोने भारतात आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हे सोने कायदेशीर मार्गाने आयात करण्यात आले असते तर सरकारला सुमारे १.४६ कोटी रुपयांचा महसूल मिळाला असता.

# LPG ग्राहकांना पुन्हा झटका! गॅस सिलेंडरच्या दरात वाढ



वृत्तसंस्था

नवी दिल्ली : देशातील ऑइल मार्केटिंग कंपन्यांनी एलपीजी सिलेंडरच्या किमतीत पुन्हा एकदा वाढ करण्याची घोषणा केली आहे. मात्र, ही दरवाढ केवळ १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडर आणि पाच किलोच्या लहान सिलेंडरपुरतीच मर्यादित आहे. घरगुती वापरासाठीच्या १४.२ किलोच्या एलपीजी सिलेंडरच्या किमतीत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. ऑइल मार्केटिंग कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीत ४२ रुपयांपासून ५३.५० रुपयांपर्यंत वाढ केली आहे. नवीन दर आजपासून लागू झाले आहेत. यापूर्वी गेल्या महिन्याच्या पहिल्या दिवशी म्हणजेच १ मे रोजी व्यावसायिक सिलेंडरच्या किमतीत सुमारे एक हजार रुपयांची वाढ करण्यात आली होती. दिल्लीमध्ये ही वाढ ९९३ रुपये होती, तर कोलकातामध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडरची किंमत ९९८.५० रुपयांनी वाढली होती. त्याचप्रमाणे मुंबईमध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीत ९९३ रुपयांची वाढ झाली होती. तर चेन्नईमध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडर ९९०.५० रुपयांनी महागला होता. आजच्या दरवाढीनंतर राजधानी दिल्लीमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडरची किंमत ३,११३.५० रुपये झाली असून कोलकातामध्ये ती वाढून ३,२५५.५० रुपयांवर पोहोचली आहे. मुंबईमध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडर आज सकाळपासून ३,०६७.५० रुपयांना उपलब्ध आहे, तर चेन्नईमध्ये त्याची किंमत वाढून ३,२८३.५० रुपये झाली आहे.

व्यावसायिक गॅस सिलेंडरप्रमाणेच 'लहान सिलेंडर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाच किलोच्या फ्री ट्रेड एलपीजी (एफटीएल) सिलेंडरच्या किमतीतही आजपासून ११ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या वाढीनंतर पाच किलोच्या एफटीएल सिलेंडरची किंमत ८२१.५० रुपयांपासून ८३२.५० रुपयांपर्यंत झाली आहे.घरगुती वापरासाठीच्या १४.२ किलोच्या एलपीजी सिलेंडरच्या किमतीबाबत बोलायचे झाल्यास, त्याच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत अखेरचा बदल यावर्षी ७ मार्च २०२६ रोजी करण्यात आला होता. त्या दिवशी घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत ६० रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली होती.

देशातील प्रमुख ऑइल मार्केटिंग कंपनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनुदानविरहित १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलेंडरची किंमत सध्या दिल्लीमध्ये ९१३ रुपये आहे. त्याचप्रमाणे मुंबईमध्ये घरगुती एलपीजी सिलेंडरची किंमत ९१२.५० रुपये आहे. तर कोलकातामध्ये ग्राहकांना घरगुती एलपीजी सिलेंडर ९३९ रुपयांना मिळत आहे. चेन्नईमध्ये घरगुती एलपीजी सिलेंडरची किंमत सध्या ९२८.५० रुपये आहे.

# एपस्टीन प्रकरणामुळे बिल गेट्सची प्रतिमा डागाळली, सार्वजनिक कार्यक्रमात 'नो एन्ट्री' ?



वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : बिल गेट्स हे जगातील सर्वात प्रभावशाली तंत्रज्ञान उद्योजकांपैकी एक आहेत. अलीकडेच उघड झालेल्या जेफ्री एपस्टीन प्रकरणात त्यांचे नाव आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणामुळे त्यांच्या प्रतिमेला धक्का लागला असून काही महत्त्वाच्या कार्यक्रमांमधून त्यांना दूर ठेवण्यात आल्याची चर्चा आहे.'द वॉल स्ट्रीट जर्नल'च्या एका अहवालानुसार, मायक्रोसॉफ्टच्या वार्षिक उएज समिटमध्ये बिल गेट्स यांची उपस्थिती नसेल. या कार्यक्रमादरम्यान ते नेहमी वॉशिंग्टनमधील त्यांच्या निवासस्थानी प्रमुख उद्योगपतींसाठी खास डिनरचे आयोजन करत असत. मात्र यावर्षी त्यांच्या टीमला असे आयोजन न करण्याचा सल्ला देण्यात आल्याचे वृत्त समोर आले आहे.

भारतामधील एका महत्त्वाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) परिषदेतही गेट्स सहभागी होणार होते. फेब्रुवारीमध्ये नवी दिल्ली येथे होणाऱ्या या परिषदेत ते प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार होते. मात्र एपस्टीन प्रकरणाशी संबंधित माध्यमांमधील चर्चेमुळे कार्यक्रमाच्या मुख्य विषयावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आल्याचे सांगितले जाते. त्यानंतर गेट्स यांनी अखेरच्या क्षणी परिषदेतून माघार घेतली. या निर्णयाला दोन्ही बाजूंनी परस्पर सहमती होती.एपस्टीन प्रकरणामुळे बिल गेट्स अनेक दिवस चर्चेत होते. या प्रकरणामुळे त्यांच्यावर अनेक टीका देखील झाल्या आहेत. न्याय विभागाच्या कागदपत्रांनुसार, गेट्स यांनी अनेक वेळा एपस्टीनची भेट घेतल्याचे समोर आले आहे. त्या काळात त्यांच्या तत्कालीन पत्नी मेलिंडा फ्रेंच गेट्स यांनी या संबंधांबाबत चिंता व्यक्त केल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.एपस्टीनला गेट्स यांच्या काही वैयक्तिक संबंधांची माहिती होती आणि गेट्स यांच्या जवळच्या सल्लागारांनी २०१९ पर्यंत एपस्टीनसोबत मोठ्या प्रमाणात संवाद साधल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र बिल गेट्स यांनी यापूर्वीच एपस्टीनची भेट घेणे ही चूक होती, असे मान्य केले आहे. त्यांनी कोणत्याही बेकायदेशीर कृत्यात सहभाग असल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. तसेच, एपस्टीनशी संबंधित सर्व कागदपत्रे सार्वजनिक व्हावीत आणि चौकशीसाठी आपण पूर्ण सहकार्य करू,अशी भूमिकाही त्यांनी घेतली आहे.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गुंतवणूक परिषदेसाठी नोंदणीचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढीसाठी ११ जून रोजी लातूर येथे जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी नव उद्योजकांनी लातूर जिल्हा उद्योग केंद्र लातूर येथे आपल्या नव उद्योग तथा व्यवसायाची माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी केले आहे.

या परिषदेचा उद्देश जिल्ह्यातील गुंतवणूक वाढवणे, नवउद्योजकांना आकर्षित करणे आणि गुंतवणूकदार-व्यवसायिकांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि लातूर जिल्ह्याला विकासाचा केंद्रबिंदू बनवून जिल्हा आणि राज्याच्या विकासाला चालना देणे हा आहे.

या परिषदेमध्ये नव उद्योजकांसोबत सामंजस्य करार होऊन त्यांना एमआययू वितरित केले जाणार आहेत.



# पालकांच्या अट्टाहासामुळेच वाढले खाजगी शिकवणी वर्गांचे प्रस्थ !

तभा वृत्तसेवा / श्रीधर स्वामी

लातूर, दि. १ जून : साधारणतः चार दशकांपूर्वी विद्यार्थ्याने खाजगी शिकवणी लावली तर त्याला सुमार बुद्धीचा समजले जात असे. जसजसा काळ बदलत गेला, परिस्थिती नेमकी उलट होत गेली. आता तर नामांकित शाळा - महाविद्यालयांपेक्षाही नामांकित शिकवणी वर्गाला पालक प्राधान्य देताना आढळून येत आहेत. त्यामुळे या घडीला पालकांच्या बुद्धीची कीव करावी की विद्यार्थ्यांच्या ? असा प्रश्न पडल्यास नवल वाटू नये. एकंदर परिस्थितीवरून पालकांच्या अट्टाहासामुळेच केवळ लातूरचा नव्हे तर सगळीकडे खाजगी शिकवणी वर्गांचे प्रस्थ वाढल्याचे दृष्टीपथास येते.

शिक्षणाच्या कक्षा सातत्याने विस्तारित होत आहेत. त्यासोबतच स्पर्धाही जीवघेणी वाढली आहे. विद्यार्थ्यांना जणू प्रत्येक श्र्वासासोबत स्पर्धेचा सामना करावा लागत आहे. या जीवघेण्या स्पर्धेत आपला पाल्य टिकावा, यासाठी पालकही प्रयत्नशील असल्याचे निदर्शनास येते. शाळा - महाविद्यालयात स्पर्धेसाठी म्हणावे तेवढे पोषक वातावरण मिळत नसल्यामुळे पाल्यांना खाजगी शिकवणी वर्गांकडे वळावे लागत असल्याचा मतप्रवाहही काही सुजाण पालकातून व्यक्त होताना आढळून येतो. काही वर्षांपूर्वी पालक आपल्या पाल्याला अग्रगण्य शिक्षण संस्थेअंतर्गत चालविल्या जाणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळावा याकरिता प्रयत्नरत असत. त्यासाठी प्रसंगी वशिल्याचा प्रसंगही उदभवला तर त्याचीही तयारी ओळखी - पाळखी काढून पालक ठेवत असत.आजही लातूरच्या काही महाविद्यालयात प्रवेश मिळावा म्हणून असे प्रकार चालत असल्याचे पाहायला मिळते.

आजचे युग हे स्पर्धेचे आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्येक बाबतीत सरस राहणे अनिवार्य आहे. आजघडीला शाळा - महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना जीवघेण्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठीचे बारकावे म्हणावे तेवढे समजावून सांगितले जात नसल्याचे पालकांचे मत आहे. शासन अनुदानित शाळा - कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक - प्राध्यापकांना वेतनाचे अनुदान देते. मात्र, त्या वेतनाच्या मोबदल्यात संबंधितांकडून केल्या जाणाऱ्या ज्ञानार्जनाच्या कामाची पडताळणी केली जात नाही. संबंधित संस्था चालकही या बाबींकडे म्हणावे तेवढे गांभीर्याने पाहत नाहीत. परिणामतः, शिक्षक - प्राध्यापकांना विना अडथळा महिन्याला वेतन अदा होते. त्याकरिता विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात काय शिकवले आहे किंवा शिकविण्याचा प्रयत्न तरी झालाय का ? हेही दुर्दैवाने पाहिले जात नाही. ही आपली आजची शिक्षण व्यवस्था आहे. कनिष्ठ महाविद्यालयातून जर विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी उकृष्ट मार्गदर्शन मिळाले तर विद्यार्थी आणि पालकांना खाजगी शिकवणी वर्गांकडे वळण्याची तेवढी आवश्यकताही भासली नसती, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

आज स्वतःला शिक्षण महर्षी म्हणवून घेणारे अनेक संस्था चालक अस्तित्वात आहेत. त्यांच्यापैकी किती जणांमध्ये शिक्षण महर्षी म्हणून घ्यायची पात्रता आहे ? असा प्रश्न विचारला गेला तर कदाचित शिक्षण महर्षी बिरुदावली लावून फिरणारेही पुढे यायला धजावणार नाहीत, हे वास्तव मान्यच करावे लागेल. शिक्षण संस्थांनाही आता व्यवसाय - उद्योगाचे स्वरूप आल्याचे दिसून येते. संस्था चालक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून भांडत नाहीत तर स्वतःच्या लाभासाठी संस्था आपल्या ताब्यात कशी येईल ? यासाठी भांडताना, वाद करताना दिसतात. संस्था चालकांची ही स्वार्थी वृत्तीच कदाचित खाजगी शिकवणी वर्ग चालविणाऱ्या मंडळींच्या लक्षात आली असावी. विद्यार्थ्यांना जे काही हवेय ते आपण महाविद्यालयापेक्षा चांगल्या पद्धतीने देऊ शकतो, हे दाखवून देण्याकामी खाजगी शिकवणी चालक कमालीचे यशस्वी ठरले, असेच एकंदर परिस्थितीवरून म्हणावे लागेल. खाजगी शिकवणी चालकांपेक्षा लातूरच्या कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल चांगला आहे. पण खाजगी शिकवणी चालक त्याची जाहिरातबाजी करतात आणि आम्ही संस्था चालक जाहिरातबाजी करण्यात कमी पडतो, अशी स्पष्ट कबुलीच एका अग्रगण्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांनी दिल्याची प्रचिती आली आहे.

शिक्षणाचे आज मोठ्या प्रमाणात बाजारीकरण झाल्याचे पाहायला मिळते. नीट - जेईई तथा तत्सम प्रवेश परीक्षांसाठी लातूरमध्ये पोषक वातावरण आहे, हे पाहून राज्यातीलच नव्हे राज्याबाहेरील अनेक खाजगी शिकवणी वर्गांनी आपले लक्ष लातूरकडे केंद्रित केले. शिक्षण क्षेत्राकडे आज व्यवसाय म्हणून पाहिले जात असल्याचे प्राप्त परिस्थितीवरून दिसून येते. त्यातूनच पालक - विद्यार्थी जाहिरातबाजीला भुलतात, ही बाब खाजगी शिकवणी चालकांच्या लक्षात आली. आपल्या व्यवसायासाठी त्यांनी आपल्या वर्गांच्या मोठमोठ्या जाहिराती करून पालकांना , विद्यार्थ्यांना भुरळ पाडून आपले इप्सित साध्य करून घेण्याचे काम केले, ही बाब मान्यच करावी लागेल. पालकही आपल्या जवळच्या मित्राचा मुलगा नामांकित खाजगी शिकवणी वर्गात आहे, तर आपल्याही मुलाला तेथेच प्रवेश मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न करत राहिले. यातूनच खाजगी शिकवणी वर्गांचे प्रस्थ वाढत गेले, असेच म्हणणे विद्यमान परिस्थितीत संयुक्तिक ठरेल.

## मोरारी बापूंच्या राम कथा महोत्सवाची सांगता



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : किल्लारी येथे गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या पू. पू. मोरारी बापू यांच्या श्रीरामकथेचा रविवारी भक्तिमय वातावरणात समारोप झाला. दि. २३ मेपासून सुरू झालेल्या या आध्यात्मिक सोहळ्यास महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि देशातील विविध राज्यांमधून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली.

रामकथेद्वारे मानवता, प्रेम, अध्यात्म आणि संस्कारांचा संदेश देणाऱ्या मोरारी बापू यांनी रामचरित्रातील विविध प्रसंगांचे रसाळ वाणीत विवेचन करताना समाजात सद्भावना, करुणा आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या विचारांना भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समारोपाच्या दिवशी प्रसिद्ध शिवमहापुराण कथाकार पंडित प्रदीप मिश्रा यांनी कथास्थळी भेट देऊन मोरारी बापू यांची सदिच्छा भेट घेतली. देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या दोन्ही कथाकारांची एकत्र उपस्थिती भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरली. त्यांच्या भेटीमुळे संपूर्ण परिसर अधिक आध्यात्मिक आणि भावपूर्ण झाला. सातही दिवस कथास्थळी भाविकांचा मोठा जनसागर उसळला होता.

भाविकांच्या सोयीसाठी आयोजकांनी महाप्रसाद, पिण्याचे शुद्ध पाणी, वाहनतळ, वैद्यकीय सेवा, सुरक्षा व्यवस्था आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतली होती. स्वयंसेवकांनीही अहोरात्र सेवा बजावत कार्यक्रम यशस्वी केला. किल्लारी, लातूर, धाराशिव, बीड तसेच परिसरातील ग्रामीण भागातून मोठ्यासंख्येने भाविक सहभागी झाले. एवढ्या मोठ्या गर्दीनंतरही कार्यक्रम शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पडल्याने आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात

### माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण, पु. अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास अभिवादन






तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीच्या निमित्ताने सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते रविवार दि. ३१ मे रोजी शहरातील अंबाजोगाई रोडवरील पु. अहिल्यादेवी होळकर चौकातील पु. अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी धनगर सकल समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यात आले. त्याबद्दल लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे सकल धनगर समाजाच्या वतीने आभार व्यक्त करुन त्यांचा शाळ, श्रीफळ, घोंगडी आणि काठी देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके, ॲड. अण्णाराव पाटील, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, लातूर मनपाचे स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे, शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर, पंचायत समिती सभापती बैले, ॲड. दीपक सूळ, विष्णू धायगुडे, पवन सोलंकर, संभाजी सुळ, एकनाथ पाटील, प्रवीण कांबळे, राजपाल भंडे, प्रा. वाघमारे, बंडू किसवे, यशवंत वाड- ीकर, शिवाजी कांबळे, प्रा. सिद्धराम कठारे, मदन धुमाळ, शिंदे, बंडगर, घोडके, चंद्रकांत घायगुडे, बैकरे, बनसोडे यांच्यासह सकल धनगर समाज पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे आभार**

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यात आले. त्याबद्दल लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे सकल धनगर समाजाच्या वतीने आभार व्यक्त करुन त्यांचा शाल, श्रीफळ, घोंगडी आणि काठी देऊन सत्कार करण्यात आला.

पुण्यश्र्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शनिवारी रात्री १२ वाजता अंबाजोगाई रोडवरील पुण्यश्र्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौकातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणात अतिषबाजी करण्यात आली. यावेळी पुण्यश्र्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा जयजयकार करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. युवकांनी जल्लोश केला.

## लातूर रेल्वे स्थानकात पीटलाईनच्या कामाला गती




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : लातूर रेल्वे स्थानकावरील पीटलाईनच्या कामाला आता बऱ्यापैकी गती आली आहे. त्यामुळे हे काम येत्या डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे. रेल्वे स्थानकावरील विविध विकासकामांना आता कमालीची गती मिळाली असून, प्रवाशांची वर्षानुवर्षांची प्रतीक्षा आता संपणार आहे.

खासदार डॉ. शिवाजी काळगे, रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगावकर आणि रेल्वेच्या विभागीय अभियंत्यांनी प्रत्यक्ष रेल्वे स्थानकाला भेट देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यामुळे प्रवाशांच्या सुविधेत मोठी भर पडणार आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक २ ची लांबी-रुंदी वाढवणे, नवीन प्लॅटफॉर्म क्रमांक ३ चे काम वेगाने सुरू आहे. गर्दी टाळण्यासाठी दुसरे प्रवेशद्वार, नवीन फूट ओव्हर ब्रिज, आणि लिफ्टची सुविधादेखील उपलब्ध करून दिली जाणार आहे.

महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी महिला सीआरपी पोलिसांची नियुक्ती आणि मालधक्क्यावरील प्लॅटफॉर्मवर शेडचे कव्हर बसवण्याच्या कामालाही मंजुरी मिळाली आहे. यामुळे आगामी काळात लातूर रेल्वे स्थानक अधिक सुसज्ज आणि सुरक्षित होणार आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : दयानंद कला महाविद्यालयात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, प्रा. शांता कोटे यांच्या हस्ते राजमाता अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य गायकवाड म्हणाले की, प्रजेच्या हितासाठी आयुष्य वेचणाऱ्या अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी केला असल्याचे ते म्हणाले. या सोहळ्याला महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना ३० जूनपर्यंत मुदतवाढ

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : यावर्षी १६ मे २०२६ पासून राष्ट्रीय जनगणनेचे काम सुरू झाल्याने शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या पूर्ण क्षमतेने होऊ शकल्या नव्हत्या. ज्या शासकीय विभागांतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या नाहीत, त्यांच्या बदल्या आता ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी करण्याचे आदेश महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांनी राजपत्राद्वारे काढल्याने बदल्या होणे अटळ असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या, सामान्यपणे वर्षातून एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्यात येतील, अशी तरतूद आहे. संपूर्ण भारतात

जनगणना २०२७ करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यात जनगणना २०२७ चा पहिला टप्पा म्हणजे घरांची यादी व गृह गणना १६ मे २०२६ पासून १४ जून २०२६ पर्यंत करायची आहे. भारत सरकारने सर्व राज्यांना जनगणना २०२७साठी नियुक्त केलेल्या जनगणना कार्याधिकाऱ्यांच्या बदल्या न करण्याची विनंती केली. म्हणून जनगणनेचा पहिला टप्पा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी २०२६ या वर्षात जनगणनेचे काम करावयाच्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी केल्या जातील, असे राजपत्रात म्हटले आहे. जनगणनेचे काम २०२७ या वर्षातही होणार आहे.

सध्या शिक्षक, कर्मचारी करीत असून, ज्यांची नियुक्ती जनगणनेच्या कामासाठी झाली आहे, त्यांना बदल्यांतून वगळण्यात आले होते. परंतु, जनगणनेचा पहिला टप्पा १४ जून रोजी संपुष्टात येणार असल्याने त्यानंतर बदल्या करण्यास हरकत नसल्याचे संकेत राजपत्राद्वारे दिलेल्या वृत्तावरून दिसत आहे. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांनी बदल्याचे संकट टाळण्यासाठी जनगणनेचे काम स्वीकारून सुटका करून घेतली खरी; पण ती आता अंगलट आली आहे. यासंदर्भात, जिल्हा परिषदेसह शासकीय कार्यालये जून महिन्यात बदल्यासंबंधी कार्यवाही करतील, अशी स्थिती आहे. ज्यांनी बदली टाळण्यासाठी जनगणनेचे काम स्वीकारले, त्यांची मोठी गोची झाली. आता बदलीतून कोणत्याच कर्मचाऱ्यांची सुटका होणार नाही, असे चित्र दिसत आहे.

## प्रभाग ६ : तक्रार ते निवारण, सर्व माहिती आता मोबाईलवर

### नागरिकांची सोय : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ॲपचे उद्घाटन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : पाणी, रस्ते, लाईट किंवा कोणतीही नागरी समस्या असो महापालिकेच्या दारात खेटे मारल्याशिवाय मार्गीच लागत नाही. बदलत्या तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून प्रभाग क्रमांक ६ मधील नगरसेवकांनी अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. प्रभागातील प्रत्येकासाठी 'नागरी सेवा ॲप' विकसित केले असून नागरिकांनी आपल्या समस्या किंवा म्हणणे ॲपमध्ये मांडले तर ते महानगरपालिकेच्या संबंधित विभागास आणि अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचते. एवढेच नाहीतर त्यावर कार्यवाही झाली हे देखील पाहता येते. या ॲपमुळे नागरिकांची मोठी सोय झाली आहे. नगरसेवक गणेश गवारे यांनी हे ॲप विकसित करुन घेतले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले.

प्रभाग सर्वसामान्यांचे प्रश्न थेट आणि जलद गतीने सोडवण्यासाठी महानगरपालिकेच्या क्रमांक ६ मध्ये एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. नागरिकांना पाणी, रस्ते, स्ट्रीट लाईट, स्वच्छता किंवा ड्रेनेज यांसारख्या नागरी समस्यांसाठी पालिकेत फेऱ्या माराव्या लागत होत्या किंवा लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करावा लागत होता. मात्र, या ॲपमुळे प्रभागातील नागरिकांना आपल्या समस्या सोडवण्यासाठी कोणाला फोन करण्याची किंवा कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही. 'नागरी सेवा हे ॲप आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करून, केवळ एका क्लिकवर आपल्या समस्येची थेट नोंद करू शकतील. ॲपवर आलेल्या तक्रारी थेट संबंधित विभागाकडे वर्ग केल्या जाणार असल्याने समस्येचे निवारण अत्यंत जलद गतीने होईल आणि नागरिकांना त्यांच्या तक्रारीची सद्यस्थिती देखील मोबाईलवर पाहता येईल.

ॲपच्या उद्घाटनप्रसंगी आ. संभाजी पाटील निलंगेकर, नगरसेवक ॲड. दीपक मठपती यांच्यासह अनेक स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा असा वापर करणे ही काळाची गरज असल्याचे गौरवउद्गार मुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.

## संक्षिप्त वृत्त...

### शासकीय निवासस्थानावरील अतिक्रमण हटवून जागा प्रशासनाच्या ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड तालुक्यातील महातपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या शासकीय निवासस्थानावरील अतिक्रमण हटवून सदर जागा प्रशासनाच्या ताब्यात घेण्यात आली असून, शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध सोनपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
महातपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत महादेव मंदिराजवळ उपकेंद्र आरोग्य साहाय्यिकेचे १५३.१० चौ.मी. क्षेत्रफळाचे शासकीय निवासस्थान आहे. संबंधित पद रद्द झाल्याने हे निवासस्थान रिक्त होते. या रिक्त शासकीय जागेवर अनधिकृतपणे ताबा घेण्यात आल्याची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आली होती.
सदर जागा रिक्त करण्यासाठी संबंधितास सन २००३ पासून वेळोवेळी एकूण पाच कायदेशीर नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. तथापि, नोटिसांचे पालन न झाल्याने महसूल विभाग, पंचायत समिती व आरोग्य विभागाच्या समन्वयाने तसेच पोलीस बंदोबस्तात दि. ३० मे २०२६ रोजी अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान शासकीय जागेचा ताबा जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडे सुपूर्द करण्यात आला. तपासादरम्यान संबंधित व्यक्तीने दि. १७ डिसेंबर २०२० ते ३० मे २०२६ या कालावधीत कोणताही कायदेशीर अधिकार नसताना शासकीय निवासस्थानाची इमारत पाडल्याचे निदर्शनास आले. या प्रकारामुळे शासनाच्या मालमत्तेचे अंदाजे ५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे.
याप्रकरणी प्राथमिक आरोग्य केंद्र, महातपुरी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम, १९८४ अंतर्गत सोनपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अशोक रावसाहेब गिते यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### किमान १० जून पर्यंत परभणी जिल्हयात बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही

**परभणी,/प्रतिनिधी:** सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही. कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी: ✻ शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये ✻ विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे व पेरणीची घाई करु नये असे आवाहन प्रशासनाच्यावतीने देण्यात आलेले आहे.



### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी-**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार प्रशांत वाकोडकर, महसूल सहायक विश्वनाथ कनके, जगदीश दुधारे आदींसह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### परभणीत ढगाळ वातावरण कायम

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी शहरात सोमवार दि.०१ जून रोजी सकाळपासून कधी कडक ऊन तर कधी ढगाळ वातावरण असे लहरी तापमान दिसून येत आहे. त्याचा परिणाम उकाडा प्रचंड वाढला आहे. यामुळे नागरिकांचया अंगाची लाहीलाही होत असल्याचे दिसत आहे.

# बैलांची ११ मुंडके व १ धड सापडले

## बोरी पोलिसांची धाडसी कार्यवाही, आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

**रामप्रसाद कंठाळे**
**बोरी,/प्रतिनिधी:-** येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कौसडी या गावात वालूर रोडवरील एका निवासस्थानी असलेल्या अवैध कत्तलखान्यात गोवंशाची १२ डोके व रक्ताच्या थारोळ्यातील १ धड सापडले. पोलीस व गोरक्षक यांच्या सतर्कतेमुळे काही बैलांना जीवदान मिळाले. घटनेतील मुख्य आरोपी अब्दुल रहमान अब्दुल करीम व त्याची पत्नी शाहिस्ता अब्दुल रहेमान फरार असून सपोनि रामेश्वर धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

जिंतूर तालुक्यातील बोरी पोलीस ठाण्याच्या अंतर्गत कौसडी या गावात ही घटना पोलिसांच्या धाडसी कार्यवाहीमुळे व गोरक्षकांच्या पुढाकारामुळे उघडकीस आली. पोलीस अधीक्षक पंकजकुमार कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली ठाण्याचे सपोनि रामेश्वर धोंडगे यांच्या नेतृत्वात बीट जमादार राजेश जटाळ यांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही धाडसी कार्यवाही शनिवार दि. ३० मे रोजी केली. पोलिसांना गोरक्षक व इतर नागरिकांकडून गेल्या काही दिवसापासून याबाबतची गुप्त माहिती मिळाली होती. सपोनि धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार जटाळ यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह सदर ठिकाणी गुप्तपणे धाड टाकली. धाड टाकल्यानंतर सदर ठिकाणचे दृश्य पाहून पोलीस सुद्धा चक्रावून गेले. या ठिकाणी बैलांची १२ मुंडके व रक्ताच्या थारोळ्यात मृत अवस्थेत असलेला एक बैल तसेच रक्ताचा सडा व धारदार हत्यारे त्यांच्या निदर्शनास आली. या कार्यवाहीत पोलीस कर्मचारी प्रकाश मोरे व संघसेन कांबळे यांचा सहभाग होता.

वालूर रोडवरील मंगरूळ तांडा रस्त्यावर आरोपीचे शेत आहे. या शेतात एका रांगेत बांधलेले सहा मोठे बैल व त्याच्या बाजूला नवीन तीन बैल बांधलेल्या अवस्थेत पोलिसांना आढळून आले.

सपोनि रामेश्वर धोंडगे यांनी या शेताची व बांधलेल्या बैलांची संपूर्ण पाहणी केली. यातील एका रांगेत बांधलेले सहा बैल हे कत्तलीसाठी आणले असावेत; असा अंदाज तेथील नागरिकांनी व्यक्त केला. जिंतूर तालुक्यात या घटनेमुळे मोठी खळबळ निर्माण झाली आहे. बोरी व कौसडी परिसरातील नागरिकांमधून बैलांच्या निर्घृण कत्तलीमुळे हळहळ व्यक्त होत असून आरोपीला व त्याच्या या दुष्कर्मात सहभागी असलेल्यांना कठोर शासन करावे; अशी मागणी जोर धरत आहे.



### बीट जमादार व गोरक्षकांचे कौतुक

**कौसडीचे बीट जमादार राजेश जटाळ व गोरक्षक विलास चौधरी, रामेश्वर चौधरी, अनिल गोरे, अक्षय सोनवणे, ओंकार चापके, सचिन भवर, मनोज देशमुख यांचे विशेष कार्याबद्दल कौतुक होत आहे.**

### गोवंशांना मिळाले जीवदान

**बीट जमादार जटाळ व गोरक्षक यांच्या गुप्त व धाडसी कार्यामुळे गाय व वासरू तसेच काही बैलांना जीवनदान मिळाले.**

### आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभूमी

**या घटनेतील मुख्य आरोपी अब्दुल रहेमान याची पार्श्वभूमी गुन्हेगारीची असून बोरी व कौसडी परिसरातील विविध खेडेगावांमधून बैलांची चोरी व नंतर कत्तल करणे या आरोपाखाली त्याच्यावर यापूर्वी गुन्हा दाखल झालेला आहे.**

## पालकमंत्री इलेक्ट्रिक वाहनातून परभणीतील कार्यक्रमस्थळी आगमन



**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी येथे संबोधी अकादमी, महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यास परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी 'नो व्हेईकल डे'चे तंतोतंत पालन करत इलेक्ट्रिक वाहनातून कार्यक्रमस्थळी आगमन केले.

विशेष म्हणजे, त्यांच्या सोबत नेहमीप्रमाणे पोलिस एस्कॉर्ट व्हॅनही नव्हती. पालकमंत्र्यांच्या या कृतीमुळे उपस्थित नागरिकांमध्ये सकारात्मक चर्चा रंगली. पर्यावरण संवर्धन, ऊर्जा बचत आणि शाश्वत वाहतुकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले. वाढते प्रदूषण आणि इंधनाचा वापर कमी करण्यासाठी पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करण्याची गरज असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून अधोरेखित केले. पालकमंत्री नामदार मेघना दिदी बोर्डीकर साहेब यांच्या या साधेपणाचा आणि पर्यावरणाबाबतच्या संवेदनशीलतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचत असून, 'नो व्हेईकल डे'सारख्या उपक्रमांना अधिक बळ मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## पोलीस पाटील हे प्रशासन व गावकऱ्यांना जोडणारा दुवा- लाहोटी

**जिंतूर ,/प्रतिनिधी-** जितुर पतीनीधी पोलीस पाटील व प्रशासन यांच्या अत्यंत जवळीक असते पोलीस पाटील शासनाची ग्रामीण भागातील एक अत्यंत महत्त्वाची नाळ आहे या नाळीमुळे शासनाच्या तालुक्याला ग्रामीण भागातील खेड्यात आला तर सर्वात अगोदर पोलीस पाटलांना विचारतो व पोलीस पाटील गावातील जी काय माहिती असेल ती योग्य पद्धतीने तालुक्याच्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना माहिती देत असतो त्यामुळे ग्रामीण भागातील पोलीस पाटील किती महतवचा आहे हे किती महत्त्वाचा आहे हे समजून सांगितलेम्हणून गाव पातळीवर काम करतात ते प्रशासनाचा चेहरा आहेत त्यामुळे त्यांनी लोकाभुमीख असले पाहिजे एस आय आर व जनगणना व विविध शासकीय योजनेचे करण्याचे आव्हान सेलू उपविभागीय अधिकारी श्रीशैलेश लाहोटी यांनी केले.



महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ जिंतूर च्या वतीने शुक्रवारी २९ रोजी कार्यशाळा व परिसंवाद या कार्यक्रमात ते बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे म्हणाले की पोलीस पाटील आमचा अभिनय आंग पासून मागील वर्षी जिंतूर तालुका डीजे मुक्त गणेश उत्सव व नवरात्र यासारखे महत्त्व पूर्ण उपक्रम या उपक्रमात पोलीस पाटील यांनी सहकार्य केले त्यामुळे आम्ही पोलीस पाटील यांनी सहाय्य केले त्यामुळे आम्ही पोलीस पाटील स्थानिक स्वराज्य संस्था मदतीने जिंतूर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत सर्व सर्व गावांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची यशस्वी काम पूर्णत्वास काम केले या कार्य शाळेच्या कार्यक्रमास प्रशांत राखे नायब तहसीलदा बोरी पोलीस ठाण्याची सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे मराठवाडा विभागीय अध्यक्ष बाळासाहेब हिंगे यांच्यासह पोलीस पाटील संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते जिंतूर तालुक्यातील सर्व गावातील पोलीस पाटील या कार्यशाळेत मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मौजे आडगांव ता जिंतूर येथील ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले, यावेळेस उपस्थित श्री प्रकाशराव दाभाडे दादा, सुरेशराव दाभाडे, विश्वनाथ राऊत, पांडुरंग गडदे, काशिनाथ राऊत, दिपक ठोके, प्रकाश गडदे, राजू दाभाडे, रामप्रसाद घोडके, गोविंद गडदे, विठ्ठल गडदे, भुजंग गडदे आदी उपस्थित होते.**

## परभणीत गांजा विक्रेत्यावर पोलिसांची विशेष पथकाची कारवाई; दीड किलो गांजा व १.३८ लाख रुपये जप्त

**परभणी ,/प्रतिनिधी-** परभणी शहरातील लोहगाव रोड गंगाखेड नाका परिसरात पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने शुक्रवारी मध्यरात्री एका घरावर छापा टाकला. या कारवाईत दीड किलो गांजा आणि १ लाख ३८ हजार रुपये रोख असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



विशेष पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारे सरताबाई म्हलारी गुंडे यांच्या घराची झडती घेण्यात आली. यावेळी पिराजी मारोती देवे हा गांजाच्या पुड्या तयार करताना आढळून आला. त्याच्याकडून गांजा व रोख रक्कम जप्त करण्यात आली.

या प्रकरणी पिराजी देवे याच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोउपनि. संदीप शिंदे पोउपनि अर्जुन टरके पोलिस अंमलदार सय्यद इरशाद सूर्यकांत ताटी कुंडलवार यशवंत वाघमारे गोविंद चुडावकर असलम शेख लिंबाजी वावळेत्यांच्या पथकाने केली.

# कोमात असलेल्या भावाच्या उपचारासाठी पैसे घेऊन निघालेल्या भावाचाही मृत्यू

## रायखेडा पाटीजवळ दुर्दैवी घटना; एक ठार, एक गंभीर जखमी

**जिंतूर ,/प्रतिनिधी:** कोमात असलेल्या भावाच्या उपचारासाठी पैशांची व्यवस्था करून संभाजीनगरकडे निघालेल्या तरुणाचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना जालना रस्त्यावरील रायखेडा पाटीजवळ रविवार (दि.३१) सकाळी ०७:३० च्या सुमारास घडली. या अपघातात त्याचा मित्र गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील दताड येथील अनिल देवीदास सुर्वे (वय २५) व संकेत दत्ता बेले (वय २५, रा. पुसद) हे दोघे दुचाकीवरून जिंतूरमार्गे संभाजीनगरकडे जात होते. अनिल सुर्वे यांचा भाऊ मागील दीड महिन्यांपासून संभाजीनगर येथील रुग्णालयात कोमात असून त्याच्या उपचारासाठी लागणारे पैसे घेऊन हे दोघे निघाले होते. दरम्यान, रायखेडा पाटीजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. अपघातानंतर दोघेही गंभीर जखमी अवस्थेत रस्त्यावर पडलेले आढळून आले. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तत्काळ जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख अजीज यांनी तपासणी करून अनिल सुर्वे यांना मृत घोषित केले. तर संकेत बेले यांच्या डोक्याला तसेच हात-पायांना गंभीर दुखापत झाल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. अनिल सुर्वे यांच्या पश्चात पत्नी व एक लहान मुलगी असा परिवार आहे. एकीकडे भाऊ कोमात असताना त्याच्या उपचारासाठी धावपळ करणाऱ्या भावाचाच अपघाती मृत्यू झाल्याने दताड गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सुर्वे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे.

घटनेची माहिती मिळताच चारठाणा पोलीस ठाण्याचे सपोनि मुजाजी दळवे, पोहेका उध्दव माने व हरिभाऊ गायकवाड यांनी घटनास्थळ व रुग्णालयाला भेट दिली. वृत्त लिहीपर्यंत या प्रकरणी पोलीस ठाण्यात कोणतीही नोंद झाली नव्हती.या घटनेची परिसरात अत्यंत मोठया प्रमाणात चर्चा होती तसेच मयत तरुणाबद्दल मोठी चर्चा दिसून आली होती.





**जिंतूर- इटोली ग्रामपंचायत मध्ये मोठ्या उत्साहात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ जयंती साजरी करण्यात आली जयंती साजरी करण्यात इटोली गावचे सरपंच उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य अमोल शेळके हरीराम शिंदे माणिक आव्हाड अशोक घुगे बाबाराव विश्वनाथ शिवाजी दत्ता खुणे सदानंद शिपले उमेश घळे दीपक उमाटे बालू नागरे परसराम शेळके व इटोली येथील जय मल्हार मित्र मंडळ व गावातील नागरिक बहुसंख्येने हजर होते.**

## अग्रलेख...

# पाकिस्तानातील पाणीटंचाई

हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना निसर्गाने भरभरून दिले आहे. दोन्ही देशांतील कोट्यवधी नागरिकांचा दाता आणि रक्षणकर्ता हाच हिमालय आहे. कडाक्याच्या थंडीपासून तर हिमालय नागरिकांचे रक्षण करतोच; शिवाय पिण्यासाठी पाणी आणि पिकांसाठी पाटामध्ये खळखळून वाहणाऱ्या जलधारेची सोयही हिमालयातील हजारो हिमशिखरे करीत आली आहेत. जगातील सर्वांत प्राचीन आणि समृद्ध अशी सिंधू संस्कृतीही याच हिमालयाच्या कुशीत फळली, फुलली. मनुष्याचा एक विचित्र स्वभाव आहे. काहीही मोफत मिळाले तर त्याची किंमत राहत नाही. पाण्याचेही तसेच. आजही आपण पाण्याच्या वापराबाबत गंभीर नाही. निसर्गाने मानवाला दिलेली पाणी ही सर्वांत मौल्यवान देणगी आहे. पाणी आपल्या जीवनमरणाशी निगडित आहे. पाणी नसेल किंवा त्याचा तुटवडा निर्माण झाल्यास हाहाकार उडतो. भारतीय हवामान खात्याने यावर्षी जो अंदाज व्यक्त केला, तो चिंता वाढविणारा आहे. सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होणार असून, जून आणि जुलैमध्ये कमी पाऊस होणार असल्याचे म्हटले आहे. मृग आठवडाभरावर असताना हवामान खात्याच्या नव्या अंदाजाने सरकारची चिंता वाढविली आहे. भारताची अर्थव्यवस्था आजही शेतीवरच अवलंबून आहे. सर्वांत जास्त रोजगार निर्मितीचे साधन अजूनही शेतीच आहे. पाऊस पुरेसा आला नाही तर शेती पिकणार नाही, धान्योत्पादनात घट होऊन महागाई वाढू शकते. त्यामुळे पाण्याचे महत्त्व ओळखून भारताने योग्य पावले उचलली पाहिजेत; शिवाय पाकिस्तानातील सध्याच्या परिस्थितीचा धडाही घेतला पाहिजे. कारण वातावरणात होणारे बदल मानवाच्या चिंता वाढवत आहेत. या समस्या काही एका विशिष्ट देशासाठी भेडसावणाऱ्या नसून त्यांनी वैश्विक रूप धारण केले आहे.

भारताचा शेजारी देश असलेल्या पाकिस्तानात सध्या भीषण पाणी समस्या निर्माण झाली आहे. आर्थिक राजधानी असलेल्या कराची शहरात सध्या नागरिकांना पिण्याचे पाणी मिळण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. या महानगरातील ७० टक्के जनता पाण्यासाठी व्याकुळ झाली आहे. ही परिस्थिती का ओढवली? १९४७ मध्ये पाकिस्तानची निर्मिती करण्यात आल्यानंतर जी सरकारे सत्तेवर आली, त्यांनी पायाभूत सुविधांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. त्याची फळे आज पाकिस्तानला भोगावी लागत आहेत. १९६० मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात सिंधू जल करार झाला. १९५० मध्ये पाकिस्तानात भीषण जलसंकट निर्माण झाले होते. या संकटाला भारतच जबाबदार असल्याचा कांगावा करीत पाकिस्तानने १९५१ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघात तक्रार केली. नद्यांच्या प्रवाहात अडथळे निर्माण करीत असल्याने गावागावांमध्ये जलसंकट निर्माण झाल्याचे तक्रारीत म्हटले. युनोच्या शिफारशीनंतर जागतिक बँकेने कराराचा मसुदा तयार करून दोन्ही देशांना सादर केला. त्यानंतर प्रदीर्घ चर्चा आणि संवादानंतर सप्टेंबर १९६० मध्ये सिंधू जल करारावर दोन्ही देशांनी स्वाक्षरी केली. करारानुसार पंजाबमधून वाहणाऱ्या रावी, सतलज आणि बियास या नद्यांवर भारताला तर काश्मीरमधून वाहणाऱ्या सिंधू, झेलम आणि चिनाब नद्यांवरील पाण्यावर पाकिस्तानला हक्क प्रदान करण्यात आला. नुकसान सहन करूनही भारत या कराराशी बांधील राहिला. एवढेच नव्हे तर १९६५ मध्ये दोन्ही देशांत युद्ध होऊनही भारताने पाणी अडविले नाही. प्रवाह न अडविता वीजनिर्मिती, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचा अधिकार भारताला मिळाला; पण त्यातही पाकिस्तानने सातत्याने अडथळे आणले. एवढेच नव्हे तर धरणातील गाळ काढण्यासही पाकिस्तान आक्षेप घेत असे. गेल्या ६० वर्षांमध्ये भारताच्या बाजूने असलेल्या धरणांमध्ये एवढा गाळ साचला होता, की पाणी साठवणूक क्षमता कमालीची कमी झाली होती. एवढेच नव्हे तर गैरभाजपा सरकारांनी पाकिस्तानच्या दबावापुढे नांगी टाकत गाळ बाहेर काढण्यासाठी तयार केलेली द्वारे सिमेंट कॉँक्रिटने बंद केली होती. आपल्या जनतेची काळजी घेणे ही प्रत्येक सरकारची जबाबदारी असते. शेजारी देशांसोबतचे संबंध कायमस्वरूपी मित्रत्वाचे अथवा शत्रुत्वाचे असतात, असे नाही. पाकिस्तान सिंधू जल करार करून बिनधास्त होता.

२०२४ मधील पहेलगाम दहशतवादी घटना झाल्यानंतर भारताने सिंधू जल करारच तात्पुरता स्थगित केला. भारत अशाप्रकारचे पाऊल उचलेल याची कल्पना पाकिस्तानने केली नसावी. त्याचे परिणाम आता पाकिस्तानच्या सर्वसामान्य जनतेला भोगावे लागत आहेत. कराचीसह पाकिस्तानातील पाणी समस्येला तेथील सरकार पूर्णपणे जबाबदार आहे. पावसाळ्यात पंजाब आणि सिंध प्रांतात पूर आला किंवा दुष्काळ पडला तर त्याचे खापर भारतावर फोडण्याचे कामच पाकिस्तान सरकार गेल्या ६० वर्षांत करीत आले आहे. भारतातून येणारे प्रचंड पाणी रोखण्याची अथवा साठवणूक करण्याची कोणतीही सोय करण्यात आली नाही. वास्तविक पाहता हिमालय आणि भारतातील नद्यांमधून वाहत येणारे पाणी साठविण्यासाठी धरणे, तलाव आणि नदी जोड कालवे बांधण्याची गरज होती. पण, केवळ भारताचा विरोध करण्यात धन्यता मानत पाणी साठविण्याच्या कोणत्याही पायाभूत सुविधा पाकिस्तानात निर्माण करण्यात आल्या नाहीत. त्याचेच परिणाम आता पाकिस्तानातील जनता भोगत आहे. गव्हाचे पीठ, पेट्रोल-डिझेलसाठी रांगा लावणाऱ्या गरीब, असहाय पाकिस्तान्यांना आता कॅन घेऊन पाण्यासाठीही रांगा लावाव्या लागत आहेत. आदर्श मानकानुसार कोणत्याही देशाकडे १२० दिवसांचा जलसाठा उपलब्ध असणे गरज असताना संपूर्ण पाकिस्तानात फक्त ३० दिवस पुरेल एवढाच जलसाठा शिल्लक आहे. कारण, गेल्या ७० वर्षांत पाकिस्तानात मोठी धरणेच बांधली नाहीत. आजही सिंचनासाठी बहुतांश कालव्यांची जी व्यवस्था आहे, ती १९४७ पूर्वीची असल्याने पाणी गळतीचे प्रमाण मोठे आहे. पाकिस्तानात आज मंगला आणि तारबेला ही दोनच मोठी धरणे आहेत. या धरणांमधील पाण्याची पातळी खालावली आहे. सर्वांत भीषण स्थिती जवळपास दोन कोटी लोकसंख्या असलेल्या कराची शहराची आहे. कराचीला दररोज १०८० दशलक्ष गॅलन पाण्याची गरज असताना केवळ ४०० दशलक्ष गॅलन उपलब्ध होत आहे. पाणीच मिळत नसल्याने अनेक कुटुंबे तात्पुरते स्थलांतर करीत आहेत किंवा शहर कायमचे सोडून इतरत्र जात आहेत. गरिबांची स्थिती फारच दयनीय आहे. पाणी माफिया सक्रिय झाले असून, ते अव्वाच्या सव्वा दराने पाणी विकत आहेत. तसेही अर्ध्यापेक्षा जास्त कराची शहर माफिया, गुंडांच्या आधिपत्याखाली आहे. उपलब्ध जलवाहिन्या फोडून पाणी फुकटात वापरण्याची रीत पाकिस्तानमध्ये सर्वत्र आहे. सोबतीला सडलेली आणि भ्रष्ट प्रशासन व्यवस्था आहे. भारताने ज्या वेगाने धरणे, कालवे आणि नदी जोड प्रकल्पांना प्रत्यक्षात उतरविले, तसे पाकिस्तानच्या कोणत्याही प्रांतात घडले नाही. त्यामुळे मनसेरा असो की कराची आणि गुजरानवाला असो की ग्वादार, पाकिस्तानातील अनेक शहरे पिण्याच्या पाण्यासाठी तडफडत आहेत. आता सामान्य जनता रस्त्यावर उतरत असल्याने शाहबाज शरीफ सरकारवर दबाव वाढत आहे. धरणांनी तळ गाठला, कालवे कोरडे पडले असून, नद्या आटल्या आहेत. सिंधू करार स्थगित झाल्यानंतर परिस्थिती आणखीनच बिकट झाली आहे. भारताने आपल्या हक्काचे पाणी अडविणे सुरू केले. याचा फटका पाकिस्तानच्या पंजाब आणि सिंध प्रांताला बसत आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी व्यवस्थाच न केल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. जलसाठे निर्माण केले असते आणि जलव्यवस्थापनाला महत्त्व दिले असते तर आज कराचीत हाहाकार उडाला नसता. हिमशिखरांचे वेगाने वितळणे, पर्यावरणातील बदल, नद्यांच्या पात्रात झालेली घट, सरकारची अनास्था, भारतावर विसंबून राहणे, वाढती लोकसंख्या, नियोजनशून्य कारभार, धरणे आणि तलावांचा अभाव आदी कारणांमुळेही पाकिस्तानात जलसंकट निर्माण झाले आहे. सरकारने त्वरित उपाययोजना केल्या नाहीत तर तेथे पाण्यासाठी यादवी माजण्याची शक्यता आहे. भारतात अजूनही परिस्थिती तितकी बिकट नाही हे आपले भाग्य. एक मात्र कायम लक्षात ठेवावे लागेल आणि ते असे की पाणी व्यवस्थापन हे वेळेवरचे काम नसते. ते सतत करत राहावे लागते.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# नव्या जगाची, नवी मांडणी!

युद्धात उडालेला धुराळा की दारूगोळा खाली आला की मित्र आणि शत्रू यांचे चेहरे जरा स्पष्ट होऊ लागतात. प्रत्येक युद्धानंतर शत्रू आणि मित्र बदलत असतात. मित्र शत्रू झालेले असतात तर शत्रू मित्र झालेले दिसतात. मग, नव्या मैत्रीच्या आणाभाका घेतल्या जातात. नव्या जगाची नव्याने मांडणी सुरू होते. जुनी समीकरणे मोडीत निघतात, नवी समीकरणे साकारली जातात. अमेरिका-इराण युद्धात तात्पुरती का होईना युद्धबंदी जाहीर झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय रंगमंचावर नेमका हा खेळ सुरू झाला आहे.

**नवी दिल्ली :** नवी दिल्लीत अमेरिकेचे विद्यमान परराष्ट्र मंत्री आणि भावी राष्ट्रपती म्हणून ओळखले जाणारे मार्को रुबियो यांनी भारत-अमेरिका मैत्रीची संकल्पना मांडली तर रशियन राष्ट्रपतींनी बीजिंगमध्ये जाऊन, चीनशी आपल्या संबंधांना नवी धार देण्याचा प्रयत्न केला. भारत दौऱ्यावर असताना, मार्को रुबियो यांनी लाख मोलाचा एक मुद्दा मांडला. जगातील सर्वांत जुनी लोकशाही असलेला देश आणि जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेला देश म्हणजे अमेरिका व भारत यांनी एकत्र आले पाहिजे. अमेरिका हे वारंवार बोलत असली तरी प्रत्यक्षात मात्र तसे करताना दिसत नाही. चीनचा वाढता धोका लक्षात घेऊन, भारत-अमेरिका मैत्रीची संकल्पना मांडणाऱ्या पत्रकारालाच ट्रम्प प्रशासनाने अटक केली होती. आता जगातील अमेरिकाविरोधी , लोकशाहीविरोधी शक्ती एकत्र येत असताना, अमेरिका एकटी पडत असल्याचे चित्र तयार झाले आहे. त्या पृष्ठभूमीवर रुबियो यांच्या या विधानाचा अर्थ लावला पाहिजे.

**नवी युती :** एक मावळलेली महासत्ता रशिया आणि एक उगवती महासत्ता चीन यांच्यात मागील १५ वर्षांपासून एक घट्ट युती तयार होत आहे. अमेरिकेने याची दखल घेत भारतासोबत तेवढीच घट्ट युती तयार करण्याचे प्रयत्न करावयास हवे होते. बराक ओबामा, ज्यो बायडेन यांच्या कार्यकाळात तसे काही प्रयत्न झालेही. पण, डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्रपती झाल्यापासून त्यांनी सतत व सातत्याने भारतविरोधी भूमिका घेतली. केवळ भारतच नाही तर आपल्या मित्रदेशांनाही अमेरिकेने दुखावले.

**दोन करार :** दुसऱ्या महायुद्धानंतर नव्या जगाची आखणी करताना दोन करार झाले होते. वॉर्सा करार आणि वॉशिंग्टन करार. अल्बानिया, बल्गेरिया, चेकोस्लाव्हिकिया, रुमानिया, हंगेरी, पोलंड व पूर्व जर्मनी यांनी वॉर्सा करारावर सह्या करून सोवियत युनियन गोटात दाखल होण्याचा निर्णय केला होता तर वॉशिंग्टन करारावर सह्या करणारे नाटो देश अमेरिकेचे मित्र देश मानले गेले. अमेरिकेच्या प्रत्येक राष्ट्रपतीने नाटो देशांशी असलेली मैत्री सांभाळली. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती बायडेन यांनी नाटोचा विस्तार करीत नाटो सदस्यसंख्या ३२ केली. आणि आज एकही नाटो देश अमेरिकेसोबत नाही. इराणची नाकेबंदी करण्यासाठी नाटो देशांनी समोर यावे, पुढाकार घ्यावा असे आवाहन राष्ट्रपती ट्रम्प यांनी वारंवार करूनही नाटो देश अमेरिका-इराण युद्धात सामील झाले नाहीत. एक काळ होता या देशांचे नेतृत्व अमेरिकेकडे होते. पण ट्रम्प यांनी नाटो देशांच्या नेत्यांना अपमानित करून त्यांना दुखावले. असे करून त्यांनी एकप्रकारे चीन-रशियाला बळकट केले आहे.

**कॅनडाही दुरावला :** कॅनडा हा पृथ्वीतलावरील दुसरा मोठा देश. अमेरिका आणि कॅनडा यांचे संबंध फार जवळचे होते. राष्ट्रपती ट्रम्प यांनी वारंवार धमक्या देत कॅनडाला दूर लोटले. टेरिफ नावाचे शस्त्र त्याच्याविरोधातही उगारले.

**तीन शक्ती :** जगाच्या राजकारणात आज तीन शक्ती एकत्र आल्या आहेत. चीन, रशिया व काही इस्लामिक देश. इस्लामिक देशांचे नेतृत्व वा मध्यस्थी पाकिस्तान करीत आहे. इराण प्रकरणात पाकिस्तानचे चांगलेच फावले. आज बहुतेक मुस्लिम देश इराणच्या बाजूने म्हणजेच चीन-रशियाच्या बाजूने झाले आहेत. आणि या तीन शक्तींची युती जगातील लोकशाही व भारत यांच्यासाठी चांगली मानली जात नाही.

**घातक निर्णय :** राष्ट्रपती ट्रम्प एकापाठोपाठ एक घातक असे निर्णय अमेरिकेसाठी आहेत. अमेरिका व नाटोने युक्रेनला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रपती बायडेन यांनी युक्रेनला सांकेतिक पाठिंबा म्हणून युद्ध सुरू असताना आपल्या पत्नीस युक्रेनला पाठविले होते. अमेरिकेने आपली अद्ययावत शस्त्रास्त्रे युक्रेनला दिली होती. कोट्यवधी डॉलर दिले. नाटो देशांनी युक्रेनला पाठिंबा दिला. शस्त्रे दिली. मात्र ट्रम्प यांनी युक्रेनला वाऱ्यावर सोडून दिले. आज युक्रेन युद्धात तग धरून आहे तो केवळ नाटो देशांच्या पाठिंब्यामुळे. नाटोने अमेरिकेचे ऐकले असते तर रशियाने केव्हाच युक्रेनचा घास गिळला असता व तो युरोपच्या प्रवेशद्वारावर धडकला असता. हे टाळण्यात आले ते नाटो देशांनी युक्रेनला दिलेल्या पाठिंब्यामुळे. अमेरिका हा नाटोचा सेनापती. पण सेनापतीनेच युद्धातून पलायन केले. पण सैनिकांनी म्हणजे नाटो देशांनी युक्रेनचा किल्ला लढता ठेवला आणि याचा परिणाम म्हणजे रशियाची दमछाक होत राहिली.

**आत्मघातकी निर्णय :** राष्ट्रपती ट्रम्प यांनी घेतलेला आणखी एक आत्मघातकी निर्णय म्हणजे सौदी अरेबिया, कतार, कुवेत, बहरीन व संयुक्त अरब अमिरात यांना लाखो कोटी रुपयांची शस्त्रे विकण्याची त्यांची भूमिका. एका इराणला नि:शस्त्र करण्यासाठी पाच मुस्लिम देशांना शस्त्रसज्ज करण्याचा ट्रम्प यांचा निर्णय योग्य मानला जाणार नाही. एकेकाळी जॉर्ज वॉशिंग्टन, थॉमस जेफरसन, अब्राहम लिंकन, रुझवेल्ट, जॉन केनेडी यांच्यासारखे महान राष्ट्रपती देणारी अमेरिका आज एवढी कंगाल झाली आहे की तिच्या नशिबी ट्रम्प नावाचे राष्ट्रपती आले आहेत.

**चीनचा उदय :** नव्या जगाच्या एका गटाचे नेतृत्व चीनकडे आले आहे. रशियाने जणू माघार घेत चीनला आपला नेता मानले आहे. आता इराण, उत्तर कोरिया यांच्यासारखे देश या गटात सामील होतील. दुसरीकडे युरोपातील देशांना नेताच नाही. त्यांच्या नेत्याने म्हणजे राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या समर्थक राष्ट्रांना दूर ढकलले आहे. पण, काही देश असे आहेत की त्यांना कोणत्याच गटात सामील व्हायचे नाही. यात भारतही आहे. भारत सोवियत युनियन वा अमेरिका यापैकी कोणत्या गटात कधी सामील झाला नाही. भारताचे रशियाचे फार जवळचे संबंध राहिले हे खरे असले तरी अमेरिकेसोबत भारताने तणाव निर्माण होऊ दिला नाही.

**संकट आणि संधी :** चिनी भाषेत संकट आणि संधी यांच्यासाठी एकच आद्याक्षर वापरले जाते. भारतासाठी सध्याची स्थिती नेमकी अशी झाली आहे. भारतासमोर संकट आहे आणि संधीही. संकट हे की चीन बळकट होत आहे आणि पाकिस्तान चीनच्या फार जवळ जात आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये याचे परिणाम प्रकर्षाने दिसले. दुसरे संकट म्हणजे अमेरिकेशी भारताचे संबंध काहीसे तणावाचे झाले आहेत. या साऱ्यावर मात करून भारताला आपली स्थिती बळकट करावयाची आहे. मात्र ही स्थिती भारतासाठी एक संधीही आहे. इराणसह काही मुस्लिम देशांशी भारताचे फार चांगले संबंध आहेत. स्व. सुषमा स्वराज परराष्ट्र मंत्री असताना त्यांनी एक चमत्कार घडविला होता. मुस्लिम देशांनी पाकिस्तानचा आक्षेप फेटाळून लावत स्वराज यांना मुस्लिम देशांच्या बैठकीसाठी आमंत्रित केले होते.

**तिसरे जग :** जग पूर्वी अमेरिका व सोवियत युनियन असे विभागलेले होते. येणाऱ्या काळात ते अमेरिका व चीन असे विभागले जाणार आहे. सध्याची स्थिती भारतासाठी एक चांगली संधी आहे. तिसऱ्या जगाचे नेतृत्व स्वत:कडे घेण्याची. पं. नेहरू यांनी हेच केले होते. भारत अलिप्त राष्ट्र चळवळीचा नेता होता. आज काही देशांसाठी भारत एक मोठी बाजारपेठ आहे. पण, भारताने केवळ 'आंतरराष्ट्रीय बाजारपेठ' न होता तिसऱ्या जगाची राजधानी व्हावे.

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# भरपूर आंबे खा कोया जपून ठेवा!

प्रत्येक ऋतूत एक गोडवा असतो. पण उन्हाळ्यातील आमरसाची मजाच काही वेगळी असते. म्हणूनच उन्हाळा म्हणजे आंबा खाण्याचा आनंद देणारा ऋतू असतो. याच कारणाने अनेक जण उन्हाळ्याची आतुरतेने प्रतीक्षा करतात. वर्तमानात महाराष्ट्रातील प्रत्येक जण उन्हाळ्याचा विशेषत: सूर्य प्रकोपाचा सामना करीत आमरसाचाही गोडवा चाखत आहे. पण हा आनंद मिळत असला तरी वाढत असलेला सूर्याचा प्रकोप पाहता पुढे काय होणार, अशीच चिंता सर्वांचा रक्तदाब वाढवीत आहे. याच गंभीर संकटावर कायमस्वरूपी तोडगा काढायचा झाल्यास राजाश्रयाचा विचार न करता प्रत्येकाने लोकाश्रय देत आमराई उभारण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे. त्याअनुषंगाने भरपूर आंबे खा, पण कोया मात्र जपून ठेवत त्याचीच पावसाळ्यात लागवड करून आमराई उभारा. अशाच स्वरूपाची नामी संधी आपल्याला मिळणार आहे. अकोला शहरात मे २०२३ मध्ये तेथील मनपा आयुक्त कविता द्विवेदी यांनी भरपूर आंबे खा पण कोया जमा करा, असे नागरिकांना आवाहन केले होते. त्यानुसार सुमारे ५ हजारांपेक्षा जास्त कोयांना गोळा करीत अकोला शहरातील खुल्या जागेवर त्यांची लागवड करण्यात आली होती. आता तसाच प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्याची गरज आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या १३ कोटी आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३ लाख ७ हजार ७१३ चौरस किलोमीटर आहे. एवढ्या मोठ्या क्षेत्रफळात आपण राहत असलो तरी वृक्षांची घटती संख्या पाहता महाराष्ट्रातील वातावरण सातत्याने तापत आहे. या स्थितीत समजा ७ कोटी लोकांनीही मनावर घेत प्रत्येकी ५ कोया या उन्हाळ्यात जमा करून त्यांची पावसाळ्यात लागवड केल्यास सुमारे ३५ कोटी आंब्याची झाडे आपण लावू शकतो. कुठलाही गाजावाजा न करता प्रत्येकाने हे कार्य स्वत:साठी करायला हवे. मिळेल त्या जागेवर आंब्याची झाडे लावल्याने फार मोठे पुण्य आपल्या पदरात पडेल.



महाराष्ट्र ही संतांची भूमी असा आपण अभिमानाने उल्लेख करतो. समजा ३५ कोटी आंब्याच्या कोया लावण्याचा प्रयोग यशस्वी ठरल्यास संत भूमीसह महाराष्ट्र आमराईचे राज्य असाही अभिमानाने उल्लेख करावा लागेल. जंगलातील प्राणी अन्न मिळत नसल्याने गावांकडे धाव घेतात. कारण काय तर वन विभागाने फळांऐवजी भलत्याच झाडांची लागवड केली आहे. त्याच चुकीचा फटका वन्यप्राण्यांसह माणसालाही बसला आहे. पण जेव्हा संपूर्ण राज्यात खुल्या जागेवर आंब्याची झाडे लागतील, तेव्हा त्यापासून सर्वांनाच लाभ होईल. गाईंना खायला आंब्याची पाने मिळतील. शिवाय माणसांना आंबा मिळेल. भूगर्भातील जलस्तर उंचावून ऑक्सिजनची मात्राही वाढेल. वाटसरूंना सावली मिळेल. म्हणजेच काय तर आंब्याची लागवड लाभदायकच ठरेल. विशेष म्हणजे घरोघरी आंबे एकसारखे आणले जात नाहीत. प्रत्येक जण आपापल्या परीने विविध जातींचे आंबे विकत आणून आमरसाचा आनंद घेत असतो. आता विविध जातींच्या आंब्यांची लागवड झाल्याने कोकणातील हापूसची मजा नागपुरातील व्यक्तीला नि:शुल्क घेता येईल. यातूनच आपल्या आंब्याच्या पारंपरिक जातींनाही लोकाश्रय मिळून त्यांचेही जतन आपोआप होईल. नागपूर जिल्ह्यातील कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता विलास मोटघरे यांनी पुढाकार घेत सुमारे २५ हेक्टर परिसरात ७७५८ झाडे लावून उभारलेली आमराई ही महानिर्मितीसाठी अभिमानास्पद प्रयोग ठरली आहे. रामटेक तालुक्यातील खिंडसी आणि मनसर रामधाम येथे पर्यटकमहर्षी चंद्रपाल चौकसे यांनी सुमारे १० हजार वृक्षांचे रोपण करीत स्वबळावर त्याचे यशस्वी संवर्धनही करून दाखविले आहे. मग आपणही आंबे खायचे आणि कोया जपून त्यांच्या लागवडीचा प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रात केल्यास चमत्कार नक्कीच घडू शकतो. शेवटी, 'तुम्हीच वापरा तुमची शक्ती, तुम्हीच घ्या लाभ पुरा, हाच जलस्वराज्यचा मंत्र खरा' या फॉर्म्युलानुसार आमराईच्या प्रयोगाला लोकाश्रय मिळाल्यास त्याचे दूरगामी लाभ सर्वांनाच मिळतील. फळांचा राजा आंबा उत्कृष्ट चवीसोबत आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. यात व्हिटॅमिन ए, सी आणि फायबर भरपूर असते. आंबा रोगप्रतिकारशक्ती वाढवतो. पचनक्रिया सुधारते आणि त्वचा निरोगी राहते. डोळ्यांना व्हिटॅमिन ए लाभदायक असल्याने दृष्टी सुधारते. आंबा कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तदाब कमी करण्यास मदत करतो. यामुळे हृदय निरोगी राहते. एकंदरीत पाहता प्रत्येकाने आपल्या आयुष्यातील कडू आठवणी विसरून आंबा जसा चोखून खाता, तसाच प्रत्येक क्षणाचा गोडवा चाखावा, तेच सर्वांसाठी फलदायी ठरेल.

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा

'आज पुन्हा जाहले सचेतन, युगायुगाचे हे सिंहासन,' असे एका गीतात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाबद्दल म्हटलेले आहे.देवगिरीचे साम्राज्य १३१९ पर्यंत पूर्णतः बुडाले होते. त्यानंतर जवळपास ३०० वर्षांपेक्षा अधिकचा काळ गेला होता. महाराष्ट्रामध्येच काय, संपूर्ण देशामध्ये हिंदू राजे कुठेही स्वाभिमानाने आपला ध्वज फडकवीत राज्य करू शकत नव्हते. पिढ्या मागून पिढ्या गुलामगिरीत जन्म घेत होत्या आणि गुलामगिरीत मरत होत्या. एवढ्या मोठ्या काळ्या रात्रीनंतर १६३० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने एक नररत्न जन्माला आले, ज्याने प्रजेला बादशाहीच्या जाचातून सोडविले. आपले स्वराज्य उभे केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे काही फक्त मराठ्यांचे स्वराज्य नव्हते, हे काही महाराष्ट्रापुरते मर्यादित स्वराज्य नव्हते, तर हे संपूर्ण भारतात राहणाऱ्या हिंदू समाजाचे स्वराज्य होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष आहे. हिंदुत्वाचा विचार घेऊन एक संघटना १९२५ साली सुरू झाली व पाहता पाहता शंभर वर्षांचा इतका मोठा कालखंड तिने एकाच विचाराने भारून पूर्ण केला. संघ जेव्हा सुरू झाला, त्यावेळेस लोक म्हणायचे की, 'काय डॉक्टर साहेब, या आठवी-नववीच्या मुलांना घेऊन तुम्ही हिंदू राष्ट्र बनविणार आहात का?' म्हणजे तो उपेक्षेचा कालखंड होता. संघाने ही उपेक्षा सहन केली. संघाचे कार्य जसे वाढू लागले, तसे शासनकर्त्यांचे सिंहासन डोलू लागले. त्यांना असे वाटू लागले की संघ सत्तेच्या स्पर्धेमध्ये उतरेल आणि त्यामुळे त्यांनी संघाला समाप्त करण्याचे प्रयत्न केले. हा विरोधाचा कालखंड होता. आणि त्यानंतर हिंदू विचार असलेले सरकार या देशामध्ये आल्यानंतर संघाकरिता शासनाच्या दृष्टिकोनातून अनुकूलतेचा काळ सुरू झाला. संघाने उपेक्षा, विरोध आणि अनुकूलता या तिन्ही कालखंडांचा सामना जरी केलेला असला, तरीही संघ स्थापनेच्या वेळेस, ज्यावेळेस पूजनीय डॉक्टरांनी स्वयंसेवकांना विचारले की, 'संघाने गुरू कोणाला मानायला पाहिजे?', त्यावेळेला स्वयंसेवकांनी उत्तर दिले की, 'डॉक्टर साहेब, आपण संघाची स्थापना केलेली आहे, त्यामुळे आपणच गुरू व्हायला पाहिजे.' परंतु त्यावेळेस पूजनीय डॉ. हेडगेवार त्यांना म्हणाले की, 'अरे, आपले काम तर हिंदू समाजाच्या संघटनेचे आहे. हिंदू समाजाचे आयुष्य तर शेकडो वर्षांचे आहे. समाजाला मार्गदर्शन करणारे, प्रेरणा देणारे असे एखादे प्रतीक आपण गुरुस्थानी ठेवले पाहिजे.' आणि त्यानंतर संघामध्ये व्यक्तीऐवजी त्यागाचे प्रतीक असलेल्या भगव्या ध्वजाला गुरुस्थानी ठेवण्यात आले.



परंतु डॉ. हेडगेवार त्यावेळेस स्वयंसेवकांना म्हणाले होते की, 'भगव्या ध्वजानंतर कुठल्या एका व्यक्तीला जर तुम्हाला आदर्श स्थानी ठेवायचे असेल, तर तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांना ठेवले पाहिजे.' इतका आदर, पूजनीय डॉ. हेडगेवार यांना छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल होता. गुलामगिरीच्या जोखडात कित्येक शतके खितपत पडलेल्या हिंदू समाजामध्ये पौरुषत्व जागवून, महाभयंकर बादशाह्यांना उलथवून, त्यांना कायमची मूठमाती देण्याचे काम याच हिंदवी स्वराज्याच्या बीजातून झालेले होते.

नागपूरच्या भूमीमध्ये उगवलेले संघाचे रोपटे पाहता पाहता विशाल वटवृक्षामध्ये रूपांतरित झाले. त्याच्या शाखा देश-विदेशात पसरल्या. आणि जसे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे सर्वसामान्य भारतामध्ये पसरलेल्या हिंदू समाजाकरिता एक दीपस्तंभ होते, त्याचप्रमाणे संघ आणि संघाचे कार्य भारतातच नव्हे, तर जगभरात पसरलेल्या हिंदू समाजाचे एक आशेचे केंद्र झाले. संघामध्ये सुद्धा ज्यांनी डॉ. हेडगेवार यांना पाहिले नाही, ज्यांनी श्रीगुरुजींना पाहिले नाही, ज्यांनी बाळासाहेब देवरसांना पाहिले नाही, असेही लोक संघाचे तेवढ्याच निष्ठेने कार्य करीत आहेत. संघाचे कार्य व्यक्तिकेंद्रित राहिले नाही. एका मागून एक सरसंघचालक होत गेले. सरसंघचालक कोण आहे, हे बघून कोणीही संघाच्या शाखेत जात नाही, तर तो संघाचा विचार, त्याचे कार्य हे बघूनच संघामध्ये प्रवेश करत असतो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील सगळ्यात मोठी घटना म्हणजे त्यांचा राज्याभिषेक. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक स्वीकारला नाही, तर महाराष्ट्रामध्ये उभे राहणारे मराठी सिंहासन हे हिंदवी सिंहासन आहे, हे ते ओळखत होते.

याचे महत्त्व ओळखून संघाने सुद्धा आपल्या सहा उत्सवांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिवसाला 'शिवराज्याभिषेक दिन' असे न म्हणता 'हिंदू साम्राज्य दिवस' असे म्हटलेले आहे. एखादी संस्था, संघटना एखादे कार्य करीत असताना एखादी गोष्ट खूपच लाखमोलाची होऊन जाते. संघाचे कार्य हे अखिल भारतीय आहे, आंतरराष्ट्रीय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही त्यावेळेस एक अखिल भारतीय घटना होती. ही गोष्ट संघाने ओळखली आणि म्हणूनच संघाच्या सर्व प्रांतामध्ये विविध भाषा बोलणारे लोक हा उत्सव साजरा करतात. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, कार्य, हा इतिहास तर सर्वसामान्य समाजापर्यंत पोहोचतोच; परंतु त्यांच्या मनात सुद्धा, छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे राजे होते, त्यांच्या जीवनापासून आणि कर्तृत्वापासून प्रेरणा ग्रहण केली पाहिजे व वर्तमानातील समस्या सोडविण्यासाठी आम्ही संघटित झालो पाहिजे, हा बोध स्वयंसेवकांना आणि समाजाला सुद्धा मिळतो. संघाचे चतुर्थ सरसंघचालक पूजनीय रज्जूभय्या म्हणायचे की, 'आम्ही रावणाचा काळ बघितला आहे, आम्ही अकबराचा काळ बघितलेला आहे, आम्ही औरंगजेबाचा काळ बघितलेला आहे आणि तो काळ आम्ही बदलविलेला सुद्धा आहे. आताही समाजासमोर उभ्या असलेल्या समस्या आम्ही समाप्त करू आणि एका वैभवशाली भारताचे निर्माण करू.' हिंदू साम्राज्य दिवस हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे, त्यांनी गाजवलेल्या पराक्रमाचे, त्यांनी सर्वसामान्य माणसांमध्ये निर्माण केलेल्या देशभक्तीचे, आत्मविश्वासाचे एक उदाहरण आहे. आजच्याही काळामध्ये समाजासमोर, राष्ट्रासमोर अनेक समस्या आहेत, कदाचित उद्याही असतील; तरीही सुद्धा आम्ही आपल्या बुद्धी, शक्ती, पराक्रमाने त्यावर मात करू आणि परमवैभवशाली भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध होऊ, हाच संदेश छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या दिनानिमित्त सर्वांनी ग्रहण केला पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## एसटीचा आज वर्धापन दिन

एक जून १९४८ रोजी राज्यात पहिली एसटीची बस धावली, म्हणून दरवर्षी १ जून एसटीचा वर्धापन दिन साजरा केला जातो. ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता अनेक अडचणी, आर्थिक संकटांचा सामना करीत डोंगर रांगा पार करीत दुर्गम भागापर्यंत एसटी आपली सेवा देत आहे. साधी बस, लालपरी ते इलेक्ट्रिक एसी बस अशा विविध रूपात सध्या एसटी प्रवाशांच्या सेवेसाठी धावत आहे. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग, शालेय विद्यार्थी अशा अनेक समाज घटकांना एसटीने ते ३० टक्क्यांपासून शंभर टक्क्यांपर्यंत तिकिटामध्ये सवलती दिल्या आहेत. प्रवाशांनी सुद्धा 'वाट पाहीन पण एसटीने जाईन' या वाक्यावर हक्क दाखवून एसटीला आपलेसे केले आहे.

बाजारात खाजगी प्रवासी वाहतुकीची स्पर्धा असतानाही खेडोपाडी प्रवाशांच्या सेवेसाठी एसटीच हक्काची बनली आहे. एसटीचा चालक- वाहक सुद्धा ऊन, पावसाची तमा न बाळगता विश्वास सार्थ ठरवत प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देत आहेत. तिकीट सवलतींचा फायदा, चांगल्या सुविधा दिल्याने आर्थिक लाभापोटी एसटीच फायदेशीर असल्याने प्रवाशांची संख्या लक्षणीय दिसून येते. परिवर्तन बस नावाने प्रवासी वाहतूक सुरू करून आधुनिक धाटणीच्या बस लालपरी, शिवाई, शिवनेरी अशा नामांतर घडवून आणलेल्या बसमुळे प्रवाशांना सुखद प्रवास घडू लागला. एसटीच्या कर्मचाऱ्यांच्या अनंत अडचणी शासन दरबारी पडून असताना अनेक कर्मचारी एसटीच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटत आहेत. त्यास प्रवाशांचीही साथ लाभत आहे. उत्तरोत्तर एसटी प्रशासन, चालक, वाहक, प्रवाशांच्या सेवेसाठी झटत राहो, याच एसटीला वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

**नितीन कुंभार**/पिंपरी, पुणे

## वाचक पत्रे

### ज्येष्ठ नागरिकांनी स्वत्व जपावे

ज्येष्ठ नागरिकांना परिवारात आणि समाजात मानसन्मानाने वागवले जात नाही अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात येत आहेत. पूर्वी संयुक्त कुटुंब होते त्यावेळी ज्येष्ठ व्यक्ती कुटुंब प्रमुख या नात्याने कुटुंबाच्या सुख-दुःखात सहभागी होत असत. कलह झाला तरी त्यावर उपाययोजना करीत असे. त्यांचा शब्द हा अंतिम मानला जात असे. स्वाभाविकच ज्येष्ठांचा मानसन्मान राखला जात असे. कालांतराने परिस्थिती बदलली. कुटुंबे विभक्त होत गेलेत. कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींना आपले स्थान आता शोधावे लागत आहे. परिवाराची परिभाषा आता संकुचित झाली आहे. पती, पत्नी, असल्यास एखाद दुसरे मूल. आजी-आजोबा, आई-वडील केवळ आवश्यकतेनुसार वापरावयाच्या वस्तू झाल्या आहेत असे म्हटले तर वावगे ठरू नये. अर्थात यालाही अपवाद आहेत. ज्या परिवारात आजही ज्येष्ठांना मानसन्मानाने वागवले जात आहे त्या आदर्श परिवाराचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून अनुकरण करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यात ज्येष्ठ व्यक्तींची प्रमुख भूमिका राहणार आहे. त्यालाच आपण स्वत्व जपणे म्हणतो.

मी आता वृद्ध झालो आहे, वय झाले आहे. त्यामुळे माझ्या मर्जीनुसार कनिष्ठांनी वागले पाहिजे हा अट्टहास सोडून द्यावा लागेल. आपली दिनदर्शिका बदलावी लागेल, सवयी बदलता आल्या तर फारच चांगले. परिवारात पोषक वातावरण निर्माण करावयाचे असेल तर माझी मर्जी म्हणून चालणार नाही. यावर उपाय म्हणजे स्वतःमध्ये बदल करणे, तडजोड करण्याची तयारी ठेवणे, वयानुसार प्राप्त झालेल्या अनुभवाचा फायदा आपल्या कुटुंबाला आणि समाजाला करून दिला तर आयुष्य अधिक सुखकर होईल, कुटुंबात शांतता राहील. जीवन जगणे असह्य होणार नाही.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

### लग्न म्हणजे पोट भरण्याचे साधन नव्हे

छत्तीसगडमध्ये न्यायालयाने लग्न करून पैशासाठी छळ करणे, त्यापेक्षा बायको नांदवण्याची ताकद नसेल तर लग्न करू नका, अशी समज दिली आहे. लग्न म्हणजे दोन जीवाचे मिलन. दोन कुटुंबांत नातेसंबंध निर्माण करणे. आता लग्न म्हणजे पोट भरण्याचे साधन झाले आहे. बेरोजगार मुले थोडासा व्यंग असलेल्या मुलीबरोबर लग्न करून आयुष्यभर मुलीच्या बापाच्या पैशावर आयुष्य जगतात. पूर्वी घरजावई म्हणजे कमीपणाचे लक्षण होते. स्त्रियांनी नोकरी करणे म्हणजे पुरुषांच्या मनगटात ताकद नसणे असे समजले जायचे. आता स्त्रिया स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. तरी सुद्धा व्यवसाय, इतर कामांसाठी माहेरून पैसे आणायला त्यांच्यामागे तगादा असतो. तिचा छळही होतो. जीव जातो. समानतेचे युग आहे. लग्नापूर्वी मुलं-मुली भेटतात. त्यावेळी काही गोष्टी स्पष्ट बोलाव्या. लग्न म्हणजे पवित्र बंधन. त्यावर पैशाचे सावट नको. पत्नी म्हणून नांदवण्याची ताकद असेल तरच लग्न करा.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## पूर्णवादी बँकेच्या मुख्य कार्यालयास आष्टी मतदार संघाचे आ. सुरेश धस यांची सदिच्छा भेट



**बीड :** शनिवार, रोजी पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेच्या बीड येथील मुख्य कार्यालयास आष्टी मतदार संघाचे आमदार मा. श्री सुरेश धस यांनी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी आमदार मा. श्री सुरेश धस यांनी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांच्या समवेत बँकिंग क्षेत्राच्या विविध विषयावर चर्चा केली तसेच बँकेच्या विविध योजनांची व सद्य स्थितीची माहिती घेतली. या प्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेश कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रल्हाद राजुरकर, सरव्यवस्थापक श्री महेश पारगावकर, CCO श्री अविनाश हिंगणीकर, वसुली विभाग प्रमुख श्री सतीश जाधव यांची उपस्थिती होती.

## पुरुषोत्तमपुरी गोदापात्रात बुडणाऱ्या भाविकास वाचवले; जवानांचा बाजार समितीच्या वतीने सत्कार



**माजलगाव, प्रतिनिधी :** तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमासानिमित्त सुरू असलेल्या यात्रोत्सवा निमित्त गोदावरी नदीपात्रात स्नानासाठी उतरलेल्या एका भाविकाचा पाण्याच्या खोल भागात जाऊन बुडण्याचा प्रसंग ओढवला होता. मात्र, तेथे कर्तव्यावर उपस्थित असलेल्या होमगार्ड राजू हरिभाऊ पंडित, मुजाहेद उस्मान शेख, सुरेश वैजनाथ भारस्कर या जवानांनी तत्परता दाखवत संबंधित भाविकास सुखरूप बाहेर काढून त्याचे प्राण वाचवले.

जवानांच्या या धाडसी आणि समयसूचक कार्याची दखल घेत माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, माजी उपसभापती निळकंठराव भोसले व ग्रामस्थ उपस्थित होते तर बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जवानांच्या शौर्याचे कौतुक करत समाजाप्रती त्यांच्या सेवाभावाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अधिकमास यात्रोत्सवादरम्यान भाविकांनी नदीपात्रात स्नान करताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. सत्कार कार्यक्रमास बाजार समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नीट पेपरफुटी प्रकरण: मुख्य आरोपीच्या अनधिकृत इमारतीवर कारवाई

**बीड, 01 जून :** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी, सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याच्या बीडमधील शाहू नगर परिसरातील चार मजली अनधिकृत इमारतीवर प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे. बीड नगरपालिकेने दिलेली नोटीस आणि अल्टिमेटम संपल्यानंतर संबंधित ठेकेदाराने स्वतःहून हे अवैध बांधकाम पाडण्यास सुरुवात केली आहे.

सीबीआयकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, लातूर आणि बीड येथून अनेकांना अटक करण्यात आली आहे. अटकेनंतर काही आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

तपासादरम्यान धक्कादायक माहिती समोर आली असून लातूरमधील RCC क्लासेसचे प्रा. शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांचे संगनमत उघड झाले आहे. लातूरमधील एका बालरोगतज्ज्ञांच्या फ्लॅटमध्ये कुलकर्णी क्लासेस चालवत असल्याचेही समोर आले आहे. याशिवाय, मोटेगावकर क्लासेसमध्ये 'प्लॅटिनम गोल्ड बॅच'च्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले जात असल्याचा आरोप आहे. तपास यंत्रणांना मिळालेल्या माहितीनुसार, कुलकर्णीचे पुण्यातील एका ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारेशीही संपर्क असल्याचे स्पष्ट झाले आहे. सीबीआय सध्या कुलकर्णी, मोटेगावकर आणि संबंधित व्यक्तींमधील कथित नेटवर्कचा सखोल तपास करत असून या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील बालकाची बुद्धिबळ स्पर्धेत धडाकेबाज कामगिरी

### साडेपाच वर्षाच्या वल्लभ कुलकर्णीची राष्ट्रीय स्पर्धेसाठी दावेदारी



**माजलगाव :** पुणे येथे सात वर्षाखालील मुलांच्या बुध्दीबळ राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा ३० व ३१ मे रोजी पुणे येथील सिंहगड इन्स्टिटयूट वाडगाव येथे संपन्न झाली.यात माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील वल्लभ अमोल कुलकर्णी (मोगरेकर) आठ पैकी सहा सामने जिंकल्याने राष्ट्रीय स्पर्धेत त्याची दावेदारी निश्चित मानली जात आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. या स्पर्धेमध्ये संपूर्ण राज्यभरातून 178 मुलांनी सहभाग नोंदवला होता या स्पर्धेमध्ये जिल्हास्तरीय निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये लढत होऊन महाराष्ट्र राज्य प्रतिनिधित्व साठी निवड होणार होती या स्पर्धेमध्ये वल्लभ मोगरेकर ने आठ पैकी सहा सामने जिंकून धडाकेबाज कामगिरी केली आहे. त्याचा पहिला सामना आंतरराष्ट्रीय मनांकन खेळाडू मुंबई सिटी चा इव्हान दुबे सोबत होता.

# धनंजय देशमुखांवरील 'तो' गुन्हा खोटा? समाधान खिंडकरच्या बनावामुळे बीडमध्ये मोठी खळबळ





**बीड :** जुन्या वैमनस्यातून थेट खोट्या गुन्ह्यांचा बनाव कसा रचला जातो? बीडमध्ये (Beed) नुकत्याच समोर आलेल्या एका घटनेने असाच एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. बंदूक रोखून जीवे मारण्याच्या प्रयत्नाचा हा संपूर्ण थरार फक्त कागदावरच होता हे आता स्पष्ट झालं आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला होता. समाधान खिंडकर याने ही तक्रार केली होती. पण पोलिसांनी केलेल्या तपासात ही तक्रार आणि देशमुखांनी दिलेली क्रॉस तक्रार या दोन्ही पूर्णपणे खोट्या असल्याचं उघड झालं आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाहून परतताना धनंजय देशमुख बीडजवळील एका हॉटेलमध्ये जेवणासाठी थांबले होते. तिथे समाधान खिंडकर देखील आपल्या मित्रांसोबत होता. मोबाईल हिसकावल्याच्या कारणावरून देशमुखांनी आपल्या कानाला थेट बंदूक लावली असा दावा समाधानने केला होता.

त्यामुळेच या प्रकरणात देशमुखांवर गुन्हा दाखल झाला होता. दुसरीकडे धनंजय देशमुखांनीही समाधान आणि त्याच्या साथीदारांवर आपल्याला शस्त्राचा धाक दाखवल्याचा प्रतिगुन्हा दाखल केला होता. या हायव्होल्टेज प्रकरणामुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती.

प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस उपअधीक्षक व्यंकटराम यांनी स्वतः तपास सुरू केला. पोलिसांनी ३० मे रोजी रात्री १० ते १२ वाजेदरम्यानचे सर्व सीसीटीव्ही फुटेज अतिशय बारकाईने तपासले. यात बंदूक रोखल्याची किंवा मारहाणीची कोणतीही घटना घडली नसल्याचे समोर आले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार जुन्या कौटुंबिक आणि न्यायालयीन वादातून हा सगळा बनाव रचला गेला. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील साक्षीदार असलेल्या स्वतःच्या सख्ख्या भावाला समाधान खिंडकरने आधीच धमकी दिली होती. आता खोट्या तक्रारी देऊन यंत्रणेची दिशाभूल केल्याप्रकरणी पोलीस थेट न्यायालयात अहवाल देणार आहेत.

या सगळ्या घडामोडींनंतर बीडमधील राजकारण पुन्हा तापलं आहे. आपण या संपूर्ण प्रकरणाबाबत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचं धनंजय देशमुख यांनी माध्यमांना सांगितलं आहे.

## केज तहसीलदारांची धडक कारवाई, एका दिवसात पाच रत्याचे अतिक्रमण केले खुले

**येवता:प्रतिनिधी :**आप्पाराव सारूक दि.२९ रोजी केज तालुक्यातील लव्हुरी-कोठी या गावचे जुने अनेक वर्षापासून अतिक्रमण करून शिव रस्ते बंद केलेले होते. दोन्ही ग्रावच्या शेतकऱ्यांनी अनेक वेळा रस्ता खुला करण्याची मागणी नियमा प्रमाणे तहसील कार्यालय,केज यांच्या कडे अनेक वर्षा पासुन होत असलेने.केजचे कर्तव्यदक्ष तहसीलदार,शुभम पवार यांनी आपल्या कर्मचारी फौज-फाट्यासह मस्साजोगच्या मंडळ अधिकारी,वैशाली देशमुख, ग्राम महसुल अधिकारी सज्जा,लव्हुरीचे ग्राम महसुल अधिकारी,अशोक चटप,भूमिअलेख कार्यालय,केजचे सुदाम चौरे,केज पोलीसांच्या बंदोबस्तात.शुक्रवारी दि.२९/०५/२०२६ रोजी लव्हुरी-कोठी येथील रस्ता अतिक्रमण कि.मी.खुले केले तसेच लव्हुरी येथील गट नं. ११०व १११ मधील पाच सर्वे नं. मधील अतिक्रमण खुले केले एकाच दिवसात पाच रस्ते खुले केल्याने शेतकऱ्यांचा जिव्हाळाचा प्रश्न सुटलेने कर्तव्यदक्ष मा.तहसीदार साहेब शुभम पवार यांचे शिस्तप्रिय व धाडसी अधिकारी म्हणुन सर्वत्र चर्चा होऊन सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.



आमच्या प्रतिनिधीने कोठी येथील सरपंच संपर्क साधला"रस्त्याचा प्रश्न सोडविला तहसीलदार शुभम पवार साहेबांचा भव्य सत्काराचे आयोजन करत आहे.
- बप्पा डोंगरे,सरपंच,कोठी

## साबला येथे " पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर " यांची जयंती साजरी

**केज - प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन,महिला व बाल विकास विभाग,मुंबई यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत कार्यालय,साबला.येथे सरपंच जनाबाई नरहरी काकडे,ग्रामपंचायत सदस्या आश्रुबाई श्रीमंत काकडे , पार्वती महादेव नाईकनवरे यांच्या हस्ते प्रथम " पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर " यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुढील कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त.गावातील ज्या महिला सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक,धार्मिक,आरोग्य विषयक समाजकार्यात उत्कृष्ट काम करत असलेल्या महिलांना ग्रामपंचायत कार्यालय,साबला.सरपंच जनाबाई नरहरी काकडे,ग्रामपंचायत सदस्या आश्रुबाई श्रीमंत काकडे,पार्वती महादेव नाईकनवरे यांच्या शुभ हस्ते सुनिता अशोक काकडे,अनिता रामराजे शिंदे,छायाबाई बारिकराव काकडे,मंगल बालाजी काकडे, आशाबाई अंकुश मुळे,राधा राम काकडे,सारिका विजय नाईकनवरे,सुरेखा विष्णू कटारे,सुरेखा श्रीराम राऊत,आम्रपाला सुधीर सरवदे,मिरा संभाजी घाडगे,आरती अनिल सरवदे वरील इत्यादी महिलांना " पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार " देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी आंगणवाडी मदतनिस वैशाली विजय सरवदे,केशरबाई अभिमान सरवदे,ऋतुजा ईश्वर नाईकनवरे,ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,पोलिस पाटील अविनाश गुलाब काकडे,समाजसेवक नरहरी काकडे,रामराजे शिंदे,गणेश कटारे,अशोक काकडे,बारिकराव काकडे,योगिराज मुळे,आश्रुबा नाईकनवरे,हनुमंत मुळे,माऊली नाईकनवरे,रामराजे काकडे, बाबासाहेब काकडे, शाम काकडे,फोटो ग्रापर राहुल मुळे, नितिन काकडे तसेच या कार्यक्रमासाठी गावातील नागरिक उपस्थित होते.

# मुंडे साहेबांना आवडेल असा संकल्प 3 जूनला करणार

### पंकजाताई मुंडेंनी व्यक्त केला मनोदय

**परळी वैजनाथ दि. ०१ :** लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची पुण्यतिथी येत्या ३ जून रोजी आहे. यादिवशी मी असा एक संकल्प करणार आहे, जो त्यांना आवडणार आहे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून तो बाजूलाच करता येणार नाही असा संकल्प.. तो काय असेल, हे त्याच दिवशी पहा असा मनोदय राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

यासंदर्भात एक व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी देशावर आणि जगावरील सध्याचे संकट पाहता मुंडे साहेबांची पुण्यतिथी आपापल्या गावात, घरीच करावी असे आवाहन केले आहे. यात त्या म्हणाल्या, मी सर्वांना आवाहन केलं होतं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही केलं होतं. आज जगावर, आपल्या देशांवर जे संकट ओढवलं आहे, त्यावर उपाय म्हणून आपल्याला काही सावधानता बाळगायच्या आहेत. इंधनाचा अपव्यय टाळायचा आहे, त्यामुळे भव्य असे आयोजन कांही दिवस नाही केले तर योग्य होईल. मुंडे साहेबांच्या पुण्यतिथीचे आयोजन भव्य असंच असतं. खरं तर, यादिवशी आपल्या मनामध्ये तीव्र दुःख असतं पण मुंडे साहेबांची ओढ, त्यांचं प्रेम आणि आपला संकल्प हे आपल्या सर्वांची पावलं गोपीनाथगडाकडे घेवुन जातात. सर्वांना परत एकदा विनंती करते की, सर्वांनी मुंडे साहेबांची पुण्यतिथी आपापल्या गावात, घरात, शहरात, वार्डात, आपण जिथे असाल तिथे करावी जेणेकरुन पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देता येईल. एका बांधवाने मला बैलगाडीचा उपाय सुचवला होता पण एवढ्या भर उन्हात पशुंनाही त्याचा त्रास होवु शकतो, त्यामुळे ते ही टाळावे. त्यांच्या सूचनेचा मी आदर करते पण जसे आपण इंधनाची काळजी घेत आहोत तशी बैलाचीही घ्यावी असे त्या म्हणाल्या.

**असा संकल्प करणार :** ३ जून रोजीचा दिनक्रम सांगताना ना.पंकजाताई म्हणाल्या की, मी सकाळी उठून मुंडे साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करणार आहे. त्यांना आवडणाऱ्या सगळ्या वस्तु आंबे, पुरणपोळी, मसाला वडी जे कांही त्यांना आवडायचे ते सगळे मी गोपीनाथगडावर जाऊन त्यांच्या समाधीसमोर अर्पण करणार आहे. फुलांची आरास तिथे करणार आहे. त्यांनी जीवनात जो संकल्प केला तो संकल्प आपण सर्वांनी पुढे न्यावा अशी प्रार्थना करणार आहे. मुंडे साहेबांना शोभेल असे काम तर मी नेहमीच करते पण एक संकल्प मी त्यादिवशी करणार आहे, त्यांना आवडणारी अशी एक गोष्ट त्यादिवशी सुरू करणार आहे आणि त्यांना अजिबात आवडत नाही अशी बंद करणार आहे. त्यांना आवडत नाही कोणतीही गोष्ट खरं तर मी करतच नाही पण एक तो संकल्प यावर्षी मी करणार आहे. जो साहेबांना आवडणार आहे, त्यांच्या व्यक्तिमत्वातून ती बाजूलाच करता येणार नाही, तो त्यांना अत्यंत प्रिय आहे, ते तुम्ही पाहाच असं त्यांनी म्हटलं आहे.

**पुण्यतिथीची तयारी :** गोपीनाथ गडावर यंदा भव्य दिव्य कार्यक्रम नसला तरी यादिवशी भजन, प्रसाद व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याची तयारी सध्या गडावर सुरू आहे.

## अनिल बेद्रे व त्यांचे शिष्य चि. कार्तिक भवर यांचा आ. सुरेश धस यांच्या हस्ते सन्मान

**बीड, 01 जून :** पंढरपूर येथे आयोजित राज्यस्तरीय अक्षर संमेलन २०२६ मध्ये "राज्यस्तरीय अक्षर गौरव पुरस्कार" जाहीर झाल्याबद्दल आष्टी येथील सुप्रसिद्ध अक्षरकला मार्गदर्शक श्री. अनिल दिगंबर बेद्रे सर व त्यांचे शिष्य चि. कार्तिक संतोष भवर यांचा आमदार सुरेश धस यांनी अद्वैतचंद्र निवासस्थानी सन्मान करून गौरव केला. गुरुंचे मार्गदर्शन, संस्कार आणि शिष्याची जिद्द, मेहनत व सातत्य यांचा सुंदर संगम म्हणजे ही गुरु-शिष्य जोडी होय. असे आमदार सुरेश धस म्हणाले. अक्षरकला, सुलेखन, फलकलेखन व रांगोळी या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून त्यांनी आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्याचे नाव राज्यभर उज्ज्वल केले आहे.


श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

रामराव पाटील बहिरगांवकर एम. सी. व्ही.सी. कनिष्ठ महाविद्यालय कन्नड ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

शॉर्ट टेंडर किंवा कोटेशन (निविदा / दरपत्रक)

सन 2026-27 या आर्थिक वर्षाकरिता फर्निचर, साहित्य, यंत्रसामुग्री, उपकरणे, स्टेशनरी, ग्रंथालय पुस्तके, ग्रंथालय साहित्य, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य व केमिकल, मानसशास्त्र, प्रयोगशाळा साहित्य, ग्रंथालय पुस्तके बायंडिंग करणे, ऑफिस रेकॉर्ड बायंडिंग करणे, विद्यार्थी संसद, गॅदरिंग कार्यक्रमासाठी साहित्य, विद्यार्थी डेव्हल डेस्क, महाविद्यालय बगीचा साहित्य, माहितीपत्रक, प्रवेश अर्ज, ओळखपत्र, नियतकालिक छपाई, महाविद्यालयाअंतर्गत परिक्षा, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, वेगवेगळ्या प्रकरची छपाई विद्यार्थी सहाय्यनिधी व विकास निधी साहित्य खरेदी महाविद्यालयाअंतर्गत रस्ता, कपाटे, टेबल, खुर्चा, फॅन, कुलर, स्टिल बाकडे, रॅक, टेबल रॅगझिन, खिडक्यांना स्लायडिंग, दरवाजे दुरुस्ती, कपाटे दुरुस्ती व कलर करणे, विद्युत मटेरियल साहित्य तसेच ग्रंथालयातील पेपर रद्दी, लॅब मधील जुने रेकॉर्डबुक रद्दी, तसेच स्टोअरमधील जुनी रद्दी व तसेच पाण्याच्या फुटलेल्या टाक्या, भंगार इ. पुरवठाधारकांनी किंवा अधिकृत विक्रेता किंवा मान्यता प्राप्त सहकारी भांडार किंवा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या वैध नोदणीकृत किंवा पंजीकृत पुरवठाधारकांकडुन मोहोरबंद (सीलबंद) शॉर्ट टेंडर किंवा कोटेशन (निविदा / दरपत्रके) दिनांक 12.06.2026 पर्यंत प्राचार्य शिवाजी महाविद्यालय कन्नड या पत्यावर पाठवावीत.

**टीप** - वरील शॉर्ट टेंडर किंवा कोटेशन करीता वस्तुंचा साहित्यांचा किंवा वरील प्रमाणे खरेदीचा तपशिल कार्यालयात मिळेल दिनांक 16.06.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता खरेदी कमिटीच्या बैठकीत वरील सिलबंद कोटेशन फोडुन खरेदीचा निर्णय घेण्यात येईल. या बाबत सर्व अधिकार राखून ठेवले आहे.

स्वाक्षरीत /-
प्राचार्य
रामराव पाटील बहिरगांवकर एम.सी.व्ही.सी. कनिष्ठ
महाविद्यालय, कन्नड ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

# परभणी-हिंगोली विधान परिषदेची सईद खान यांना उमेदवारी

## अखेरच्या दिवशी नाट्यमय घटना, महायुतीत धुसफुसीची चिन्हे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जून**



परभणी-हिंगोली विधान परिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी नाट्यमय घडामोडी घडल्या. शिवसेनेतून उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार असलेल्या माजी आमदार विप्लव बाजोरीया यांचा पत्ता कट होऊन त्यांच्याऐवजी शिवसेनेचे अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सईद खान यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे आता महायुतीत मतदानावरून धुसफुस होण्याची दाट चिन्हे दिसत आहेत.
परभणी-हिंगोली विधान परिषदेची जागा महायुतीमध्ये शिवसेना शिंदेगटाने सोडवून घेतली. त्यामुळे पुन्हा एकदा शिवसेनेकडून बाजोरीया यांचे नाव पुढे आले होते. विप्लव बाजोरीया यांच्या वडीलांनी हिंगोलीत पत्रकार परिषद घेत विकास कामांची माहीती दिली. बाजोरीया यांनी देखील मतदारांशी संपर्क साधून आपण रिंगणात उतरणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर माजी मंत्री अर्जून खोतकर यांचे चिरंजीव अभिमन्यू खोतकर यांनीही उमेदवारीसाठी दावा केला होता. त्यामुळे खोतकर की बाजोरीया यापैकी एका नावावरच अंतिम निर्णय होणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात होत होती.
दरम्यान शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनीही नेमके कोणाच्या नावावार शिक्कामोर्तब होणार ही बाब अतिशय गोपनीय ठेवली होती. त्यातच खोतकर यांनी निवडणुकीतूनमाघार घेत असल्याचे जाहीर केल्यानंतर विप्लव बाजोरीया यांनाच उमेदवारी मिळेल असा कयास राजकीय वर्तुळात बांधल्या जाऊ लागला होता. त्यातून काही मतदारांनी बाजोरीया यांच्याशी संपर्कही साधून आपला पाठींबा असल्याचे स्पष्ट केले होते.
त्यानंतर आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी शिवसेनेत नाट्यमय घडामोडी झाल्या आणि अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सईद खान यांना उमेदवारी दिली जात असल्याचे जाहीर करण्यात आले. त्यानुसार सईद खान यांनी महायुतीच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांशी संपर्क साधला आहे. ऐनवेळी सईद खान यांची उमेदवारी जाहीर झाल्याने आता महायुतीमधील पक्षातील मतदारांना पक्षादेश पाळावा लागणार आहे. त्यामुळे ही निवडणुक कोरडी जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.
शिवसेनेचे माजी आमदार विप्लव बाजोरीया यांच्यावर उपरा उमेदवार असल्याची टीका शिवसेनेतील काही नेत्यांमधूनच होत होती. काहींनी त्यांच्या उमेदवारीला अप्रत्यक्ष विरोधही केला होता. परंतु दोन दिवसांपूवी गोपीकिशन बाजोरीया हे चिरंजीव विप्लव बाजोरीया यांच्यासाठी मैदानात उतरले. त्यांनी हिंगोली येथे प९कार परिषदेत घेत माजी आमदार विप्लव बाजोरीया यांनी हिंगोली विधान परिषदेमध्ये कोट्यावधींची कामे केल्याची माहीती दिली. परंतु त्यांना यावेळी उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे त्यांचे समर्थक मात्र नाराज झाल्याचे दिसत आहे.
दरम्यान, निवडणुकीच्या रणधुमाळीत मतदारांची फोडाफोडी होणार असल्याचे बोलले जात असून महायुतीतील अंतर्गत धुसफुस उमेदवारीसाठी अडचणीची ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. हिंगोलीमध्ये शिवसेना व भाजप यांच्यातील सुप्त संघर्ष आणि त्यातच बाजोरीया यांना डावलून सईद खान यांना उमेदवारी दिल्यामुळे विधान परिषद निवडणुकीत चुरस निर्माण होणार आहे. दुसरीकडे उबाठा शिवसेनेकडून डॉ विवेक नावंदर यांना उमेदवारी मिळाली आहे. दोन्ही शिवसेनेत आता काट्याची टक्कर होणार असल्याचे दिसत आहे. महायुतीमधील मित्र पक्ष युती धर्म पाळतील का असा सवालही उपस्थित झाला आहे.

# राज्य शासनाच्या अनुसूचीत जाती उपवर्गीकरण प्रक्रियेला विरोध



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जून**

राज्य शासनाने अनुसूचीत जाती उपवर्गीकरण प्रक्रियेला सुरूवात केली असून सदरील उपवर्गीकरण प्रक्रियेत अनेक संदीग्धता व अस्पष्टता असून या प्रक्रियेचा निषेध करीत ही प्रक्रिया रद्द करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.
अनुसूचीत जाती उपवर्गीकरण विरोधात सोमवारी हिंगोलीत मोर्चा काढण्यात आला. तसेच सदरील प्रक्रियेचा विरोध करीत जिल्हा प्रशासनामार्फत राज्य शासनाला निवेदन सादर करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने अनुसूचीत जाती समाजातील महिला व पुरूष सहभागी झाले होते.
निवेदनात सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचीत जाती आरक्षण उपवर्गीकरण संदर्भाने दिलेला निकाल हा एकांगी व संविधानातील अनुच्छेदांची चुकीची व्याख्या लावून दिलेला निकाल असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनुसूचीत जाती हा एक संघ जाती समूह आहे. तेव्हा या जाती समूहाची उन्नती उपवर्गीकरण करून करणे हे असंविधानिक व अन्याय करणारे आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने अनु-सूचीत जातीच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तत्काळ रद्द करावी, शासनाने नियुक्त केलेल्या अनंत बदर आयोगाचा अहवाल तत्काळ सार्वजनिक करावा, देशात व राज्यात जातीनिहाय जनगणना करावी, अनुसूचीत जातीच्या लोकसंख्येनुसार आरक्षणामध्ये वाढ करण्यात यावी, अनुसूचीत जाती, जमातीचा शासकीय व निमशासकीय सेवांमधील अनुशेष तत्काळ भरावा, खुला प्रवर्ग म्हणजे सर्वसाधारण गुणवत्ताधारक उमेदवारांची यादी असते. यासाठी अनुसूचीत जाती जमाती व इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना सर्व साधारण गुणवत्ताधारक यादीपा-सून वंचीत ठेवू नये आदी मागण्या करण्यात आले. निवेदनावर मधुकर मांजरमकर, किरण घोंगडे, विजयकुमार एंगडे, रमेश धाबे, दिलीप भिसे, सुखदेव बलखंडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शेतकऱ्यांच्या वेशात जाऊन जुगार अड्ड्यावर धाड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जून**



सेनगाव तालुक्यातील हत्ता पाटीजवळ एका शेतात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर परीविक्षाधीन पोलीस उप-धीक्षक मयूर रसाळ यांच्या पथकाने शेतकऱ्याच्या वेशात जाऊन धाड टाकली. यावेळी पाच जणांना ताब्यात घेतले असून घटनास्थळावरून ५४ हजार ६१० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे चालकांवर वेळोवेळी कठोर कार्यवाही करून सळो की पळो करून सोडले आहे. दि ०१ जून २०२६ रोजी पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार परीविक्षाधीन पो-लीस उपाधीक्षक मयूर रसाळ यांच्या पथकाला पोलीस स्टेशन सेनगाव हद्दीत युवर अड्ड्यावर छापा टाकून कार्यवाही करण्यासाठी पाठवण्यात आले. सदरचा जुगार अड्डा हा पो-लीस स्टेशन सेनगाव अंतर्गत हत्ता पाटीपासून शेतशिवारामध्ये असल्याने पोलीस पथकाने शेतकऱ्याच्या वेशात जाऊन हत्ता पाटीपासून एक किलोमीटर अंतरावरील शेतशिवारात छापा मारला असता सदर ठिकाणी पुंजाजी लोभाजी गडदे, ज्ञानबा कोंडूजी पादरे, अनिल कचरू साळवे, रवी गुलाब चव्हाण, भाऊराव रामराव पवार यांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून ५२ पत्ते चार ४ मोबाईल व जुगाराचे साहित्य रोख रखम १४,६१० असा ५४,६१० चा मुद्देमाल जप्त करून पोलीस स्टेशन सेनगाव येथे मटका जुगार व तिरट नावाचा जुगार खेळणे संदर्भाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मयूर रसाळ, पोनि मोहन भोसले, सपोनि शिवसांब घेवारे, अंमलदार भुजंग कोकरे, संदीप जाधव, किशोर सावंत, हरिभाऊ गुंजकर, साईनाथ कंठे यांच्या पथकाने केली आहे.



**हिंगोली- सध्या हिंगोली शहरासह जिल्ह्यात तापमानाचा पारा ४० अंशाच्यावर आहे. त्यामुळे उकाडा जाणवत आहे. या उकाड्यापासून बचावासाठी शहरानजीक असलेल्या क्रिडा विभागाच्या जलतरणिकेत पोहण्याचा आनंद घेतांना बच्चे कंपनीसह वडील धारी माणसे दिसत आहेत. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### उपजिल्हा रूग्णालयात तंबाखूमुक्ती सप्ताह

हिंगोली- व्यसनमुक्तीचा प्रचार आणि प्रचार करणाऱ्या नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याच्या वतीने जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या तंबाखूमुक्ती जनजागरण सप्ताहाचा समारोप येथील उपजिल्हा रुग्णालयात दि. ३१ रविवारी पार पडला. जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंच, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखू-तंबाखूजन्य पदार्थ दुष्परिणामाबाबत जिल्ह्यातील विविध तालुक्यात जनजागरण राबविण्यात आले. यादी तंबाखू विरोधी दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालयात डॉ. प्रतिक वरवंटे, जिल्ह्या-तील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत लोखंडे थोरावेकर, व्यसनमुक्ती चळवळीचे कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. वसमत शहरातील आठवडी बाजार, औंढा, हिंगोली, कळमनुरी येथील सार्वजनिक ठिकाणी जिल्हा संघटक विशाल अग्रवाल यांच्या हस्ते तंबाखूमुक्त जीवनाबाबत प्रबोधन अभियान राबविण्यात आले. यावेळी जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त तंबाखू दुष्परिणाबाबत पत्रकाचे वितरण करण्यात आले. तंबाखूमुक्ती सप्ताहात शुभदा सरोदे, मृण्मयी अग्रवाल, बालाजी दुमाने, सुभाष कुंभारकर आदींनी परिश्रम घेतले.

### २४६ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २४६ वाहन चालकांविरूध्द कारवाई करीत त्यांच्याकडून २ लाख ८८ हजारांचा दंड वसूल केला आहे.

# प्रलंबीत मानधनासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे उपोषण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जून**

पंचायत समितीमधील पाणी व स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मागील सहा महिन्यांपासून मानधन मिळाले नाही. तत्काळ मानधन देण्यात यावे या मागणीसाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांनी उपोषण सुरू केले आहे.
मागील अनेक वर्षापासून कमी मानधनावर हे कर्मचारी काम करीत आहेत. डिसेंबर २५ ते मे २०२६ पर्यंतचे मानधन थकीत असल्यामुळे या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. मुलांची फी, उदरनिर्वाह तसेच आरोग्याचा खर्च कसा करायचा हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. प्रशासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करावा तसेच तत्काळ मानधन अदा करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनात बी सी खंदारे, आर जी सोनुने, आठवले, भगत, कांबळे, वानखेडे, पानपट्टे आदी सहभागी झाले आहेत.

# जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेहस्ते पर्यावरण पूरक ई-शिवाई बसचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जून**



एसटी महामंडळाच्या ताफ्यात आधुनिक आणि पर्यावरणपूरक अशा 'ई-शिवाई' बसेस दाखल झाल्या असून, आज १ जून २०२६ रोजी हिंगोली आगारात या बसेसचे भव्य उद्घाटन करण्यात आले. हिंगोली जिल्ह्यासाठी एकूण २१ ई-बसेस मंजूर झाल्या असून, त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ४ बसेस आगारात सुखरूप दाखल झाल्या आहेत. या आधुनिक ई-शिवाई बसचे लोकार्पण जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले.
याप्रसंगी सहायक पोलीस निरीक्षक आनंद बनसोडे, अशोक धामणे, आगार व्यवस्थापक किशोर महाजन, स्थानकप्रमुख श्रीमती सुनिता गोरे आणि वाहतूक निरीक्षक फिरोज शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.
या ई-बसेसची वैशिष्ट्ये सांगताना आगार व्यवस्थापनाने माहिती दिली की, ही बस केवळ दीड तासात (१.५ तास) पूर्ण चार्ज होते. एकदा पूर्ण चार्ज झाल्यानंतर ही बस तब्बल३०० किलोमीटरपर्यंतचा प्रवास विनाखंड करू शकते. यामुळे प्रवाशांचा प्रवास गतिमान, आरामदायी आणि प्रदूषणमुक्त होणार आहे. हिंगोली आगारातून या पहिल्या टप्प्यातील बसेस खालील प्रमुख मार्गांवर प्रवाशांच्या सेवेत धावणार आहेत. हिंगोली ते छत्रपती संभाजीनगर, हिंगोली ते नांदेड, हिंगोली ते अकोला, हिंगोली ते परळी, हिंगोली ते रिसोड या मार्गावर धावरणार आहेत.
या सोहळ्याला दिगंबर दराडे, सचिन पारीख, वैभव वरवंटे, मुकेश ठोंबरे यांच्यासह 'ईव्ही ट्रान्स' व 'एसव्ही ट्रान्स' कंपनीचे प्रतिनिधी श्री. कसबे, संकेत पवार, सिद्धेश्वर केंद्रे, श्री. वलेकर आणि चौधरी यांच्यासह आगार व वाहतूक विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
हिंगोली आगारात दाखल झालेल्या या ई-बसेसमुळे प्रवाशांना आधुनिक आणि आरामदायी सेवा मिळणार आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी आणि प्रवाशांचा वेळ वाचवण्यासाठी या बसेस मैलाचा दगड ठरतील, असा विश्वास याप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. नवीन ई-बस सुरू झाल्यामुळे हिंगोलीकरांमधून अत्यंत समाधान व्यक्त होत आहे.

# औंढ्यात सकल मातंग समाजाचे तहसीलसमोर धरणे आंदोलन अनुसूचीत जातीचे उपवर्गीकरण करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जून**



महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण अ, ब, क, ड ची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी औंढा नागनाथ तालुक्यातील सकल मातंग समाज बांधवांच्या वतीने दि. १ जून रोजी औंढा नागनाथ तहसील कार्यालयाच्या गेट समोर एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन करून मागण्याचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना औंढा नागनाथ तहसीलदार हरीश गाडे यांच्या मार्फत देण्यात आले आहे.
राज्यातील अनुसूचित जाती सामाजिक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या एकसंध नसून त्या विविध स्तरांमध्ये विभागलेल्या आ-हेत त्यामुळे मोठ्या जातींनी आरक्षणा-चा मोठा लाभ घेतला असून मातंग व तत्सम जाती अजूनही सर्व क्षेत्रात मागे राहिले आहेत त्यामुळे उपवर्गीकरण करणे ही काळाची गरज असल्याचे निवेदनात नमूद केले असून अनुसूचित जाती उपवर्गीकरणाची अ, ब, क, ड तात्काळ अंमलबजावणी करावी, साहित्यरत्न डॉ अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा व मुंबई विद्यापीठात त्यांचे नाव देण्यात यावे, क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोगातील शिफारशीची तात्काळ प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. बीड येथील मातंग समाजाच्या उमेश दळवी या युवकाचा खून करून फरार झालेल्या आरोपींना तात्काळ अटक करून हा खटला फास्ट ट्रॅक अंतर्गत चालून आरोपींना फाशी-ची शिक्षा देण्यात यावी व उमेश दळवी यांच्या परिवारात शासनाकडून २५ लाख रुपये देण्यात यावी यासह विविध मागण्यासाठी हे एकदिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी समाजभूषण विलास मंडलिक, अविनाश गणहिरे, राधिका चिंचोलीकर, अनिल खंदारे,अशोक आव्हाड, गणेश रणखांबे, आर के रणखांबे, सुरेश कसाब, राज रणखांबे, मरीबा वावळ, ऋत्विक रणखांबे, रमेश सावळे, गणेश वाव्हळ, दशरथ खंडागळे, सुभाष पाटोळे, विशाल रणखांबे, विशाल घोडे, रामराव सोनवणे, साहेबराव मंडलिक, नागेश गायकवाड, दीपक रणखांबे,बाळू ढोकणे, विलास रणखांबे, विमलबाई मंडलिक, चंदाबाई वाकुडे, शीला वाकुडे, उत्तम ढोकणे भिवाजी सरोदे, अविनाश रणखांबे, राजू रणखांबे, कैलास रणखांबे उत्तम वाव्हळे यांच्यासह औंढा नागनाथ तालुक्यातील सकल मातंग समाजबांधव या धरणे आंदोलनात उपस्थित होते.

# मेंढपाळ बांधवाकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जून**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त औंढा नागनाथ येथील आठवे ज्योतिर्लिंग श्री नागनाथ मंदिराच्या पश्चिम मुख्य द्वारासमोर असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पूर्णाकृती पुतळ्यास धनगर समाज मराठवाडा अध्यक्ष वैजनाथ पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली फेटे बांधत घोंगडी काठी घेऊन विदर्भ व मराठवाड्यातील मेंढपाळ समाज बांधवांच्या वतीने दिनांक १ जून रोजी ११ लीटर दुधाचा दुग्धभिषेक करत जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.
यावेळी सर्व मेंढपाळ बांधवांनी फेटे बांधून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास ११ लिटर दुधाचा दुग्धभिषेक केला व पुतळ्यास गुलाब पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. धनगर समाज मराठवाडा अध्यक्ष वैजनाथ पावडे, माजी पंचायत समिती सदस्य नंदूभाऊ रवंदळे, भानुदास कुरवाडे, बाळू पिसाळ, किसन टेळे, समाधान शिंदे, नवनाथ हाडगे, समाधान करणे, रोहिदास कुराडे, लहानु शिंदे, अनिल येळे, लहू बूचकुले, विलास येळे, रामा येळे, सुधाकर सातपुते, गजानन करनर, गुलाबी येळे, पिंटू येळे, रामा पिसाळ, यांच्यासह विदर्भ मराठवाड्यातील मेंढपाळ बांधव यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### ५ जून रोजी मोफत रक्त तपासणी शिबीर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : शहरातील नवजीवन वैद्यकीय सेवा प्रतिष्ठान लातूर लॅबोरेटरीच्या वतीने शुक्रवार दि. ५ जून रोजी मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत सीबीसी, बीएसएस, टीएसएच आणि एचआयव्ही तपासणी मोफत करण्यात येणार आहे. याशिवाय रक्तदान करणाऱ्या दात्यांना हेल्मेट देण्यात येणार आहे.

### आनंदग्राम येथील अनाथाश्रमात अन्नदान सेवा



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. १ जून : लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार रमेशअप्पा कराड यांच्या वाढदिवसानिमित्त आनंदग्राम, जि. बीड येथील अनाथाश्रमात अन्नदानाचा उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या उपक्रमातून गरजू बालकांना भोजन दिले. रुपनारायण फर्टीलायझरचे संचालक तथा भाजप कार्यकर्ते उमेश सोमाणी यांचा सातत्याने

विविध उपक्रमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याचा नेहमीच पुढाकार असतो. लातूर ग्रामीणचे आ. रमेश कराड यांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चास फाटा देत अन्नदानासारख्या विधायक कार्यातून सामाजिक जाणीव जागृती व्हावी या उद्देशाने उमेश सोमानी यांनी अनाथाश्रमात अन्नदानाचा उपक्रमांचे आयोजन करून वाढदिवस साजरा केला.

# कवळी हिप्परग्यातील विकास कामांची आमदारांनी केली पाहणी
## शेतकऱ्यांनी व्यक्त केले समाधान



तभा वृत्तसेवा

औसा दि. १ जुन : जलसमृद्ध औसा अभियान व एकात्मिक विकास कार्यक्रमांतर्गत हिप्परगा व कवळी परिसरात सुरू असलेल्या नाला खोलीकरण, सरळीकरण व जलसंधारण कामांची आमदार अभिमन्यू पवार यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी कामांची सविस्तर माहिती घेतली तसेच परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी, समस्या व अपेक्षा जाणून घेतल्या. शेतकऱ्यांनी मांडलेल्या विविध प्रश्नांवर तत्काळ उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना त्यांनी सूचना दिल्या.

जलसमृद्ध औसा अभियानाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसंधारणाची व्यापक चळवळ उभी करण्यात येत असून, हिप्परगा व कवळी येथे सुरू असलेल्या नाला खोलीकरण व सरळीकरण कामांमुळे पावसाचे पाणी अधिक प्रमाणात अडविणे आणि जमिनीत मुरविणे शक्य होणार आहे. परिणामी भूजल पातळीत वाढ होऊन परिसरातील बोअरवेल, विहिरी आणि अन्य जलस्रोतांना नवसंजीवनी मिळणार आहे. या कामांमुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढेल तसेच भविष्यातील पाणीटंचाई कमी होण्यास मोठी मदत होईल, असे मत उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केले.पाहणी दरम्यान आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले की, जलसमृद्ध औसा अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करणे, भूजल पातळी वाढविणे आणि शेतकऱ्यांना शाश्र्वत जलस्रोत उपलब्ध करून देणे हा आहे. जलसंधारणाची कामे ही केवळ विकासकामे नसून ती ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी आणि शेतीला स्थैर्य देणारी महत्त्वाची गुंतवणूक आहे. नाला खोलीकरण, सरळीकरण आणि जलसाठा निर्मितीमुळे परिसरातील शेती, पशुपालन आणि ग्रामविकासाला निश्र्चितच चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

मराठवाड्यातील औसा आणि तुळजापूर दोन तालुके सातत्याने अवर्षणग्रस्त परिस्थितीचा सामना करत आहेत. या पार्श्र्वभूमीवर आगामी काळात औसा तालुक्यातील ७३ अवर्षणग्रस्त गावांना जलसमृद्ध करण्याचा आपला मानस असल्याचे आमदार पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

जलसंधारणाच्या विविध उपक्रमांमुळे दुष्काळमुक्तीचा मार्ग अधिक सक्षम होईल आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. क्रिएटिव्ह फाउंडेशन, टाटा मोटर्स फाउंडेशन, आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे जलसंधारण क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडून येत असून स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांकडून या कामांचे स्वागत करण्यात येत आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून शाश्र्वत विकासाचा मार्ग निर्माण होत असल्याने या उपक्रमाबद्दल नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले.

यावेळी शेतकऱ्यांनी आमदार अभिमन्यू पवार तसेच क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परीक्षित पवार यांचा सत्कार केला. जलसंधारणाच्या कामांबाबत घेतलेल्या पुढाकाराबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परीक्षित पवार, हिप्परगा येथील सरपंच संतोष गोरे, माळकोडजीचे सरपंच जयशंकर विभुते, टाका येथील उपसरपंच अतुल शिंदे, सदाशिव जोगदंड, गणेश माळी, डॉ. देशमुख, विलास काटे यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी, लोकप्रतिनिधी आणि अभियानाशी संबंधित पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भाजीपाल्याचे दर वाढले

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याच्या स्त्रोत मोठया प्रमाणात कमी झाल्याने भाजीपाला लागवडीचे क्षेत्रही घटले आहे. लातूरच्या रयतु बाजारात भाजीपाल्याची आयात मोठया प्रमाणात घटली आहे. त्यामुळे कोथींबर ६० ते ७० रूपये किलो प्रमाणे विक्री होत आहे. पालक १० ते १५ रूपये प्रमाणे पेंढी विक्री होत आहे. टोमॅटो ४० ते ६० रूपये प्रमाणे विक्री होत आहेत. शेपू २० रूपये पेंढी प्रमाणे विक्री होत आहे. भाजीपाल्याचे दर वाढल्याने नागरीकांच्या आर्थिक बजेटवर परिणाम होत आहे.

### डॉ. मनिषाताई होळकुंदे 'महाराष्ट्र भुषण' पुरस्काराने सन्मानित




तभा वृत्तसेवा

कासार शिरसी दि. १ जून : निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील एकता बहुउद्देशिय महिला मंडळ तथा आधार वृद्धाश्रमाच्या अध्यक्षा डॉ. मनिषाताई होळकुंदे यांना आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन नाशिक यांच्या वतीने 'महाराष्ट्र भूषण' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार फाउंडेशन चे अध्यक्ष गणेश विटकर आणि सचिव तेजस्विनी दिवटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप सन्मानपत्र, मेडल, आणि मानचिन्ह देऊन येथोचित गौरव करण्यात आले.

डॉ. मनिषाताई होळकुंदे यांनी समाजातील विविध गरजूंना मदतीचा हात देत त्यांच्या जीवनातील अंधार दूर करण्यासाठी व त्यांच्या चांगल्या भविष्यासाठी सदैव कार्य करत असतात. अनेक निराधार आजी आजोबांची जबाबदारी घेत वृद्धाश्रमाच्या माध्यमातून स्वतःच्या आई वडिलाप्रमाणे त्यांची सेवा त्या करतात. तर गोशाळेच्या माध्यमातून मुक्या प्राण्यांची सेवाही करत आहेत. या त्यांच्या सर्व कार्याची दखल घेऊन यापूर्वीही त्यांना इंग्लंड येथील संस्थेच्या वतीने आंतरराष्ट्रीय स्तराचे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहे तसेच समाजकार्यातील डॉक्टरेट पदवीही देण्यात आली असून आता या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आले आहे.

सदरील पुरस्कार वितरण सोहळा गुरुदक्षिणा सभागृह, कृषी नगर नाशिक या ठिकाणी संपन्न झाला या भव्य आणि दिव्य पुरस्कार सोहळ्यासाठी प्रसिद्ध उद्योजक अमोल गोटे भारतीय लष्करातील लष्कर प्रमुख कॅप्टन हडताळे, आणि विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेले मान्यवर यावेळी उपस्थित होते तसेच महाराष्ट्रासह परराज्यातील प्रशासकीय अधिकारी,मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी डॉ. मनिषाताई बोलताना म्हणाले की, मला मिळणाऱ्या प्रत्येक पुरस्काराने मला समाजकार्य करण्याची प्रेरणा व ऊर्जा मिळत असून माझ्या कार्याची दखल घेऊन विविध संस्थानी मला दिलेल्या पुरस्काराबद्दल मी आभारी असून या मिळत असलेल्या पुरस्काराबरोबर माझी जबाबदारीही वाढत आहे व सदैव मी या समाजकार्यात अशीच सेवा करत राहीन असे त्या म्हणाल्या.

# डॉ. अरविंद भातांब्रे यांचा नागरी सत्कार



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १ जून : तालुक्यातील उमरगा(हा) येथील जगदीश लोभे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर तातडीने उपचार करून त्यांचे प्राण वाचवणारे साई क्रिटिकेअर हॉस्पिटल, निलंगा चे संचालक डॉ. अरविंद भातांब्रे यांचा आज समस्त उमरगा ग्रामस्थ व लोभे परिवाराच्या वतीने जाहीर नागरी सत्कार करण्यात आला.

कोयत्याचे घाव वर्मी लागल्याने जखमी जगदीश लोभे रक्तबंबाळ अवस्थेत शेवटचा श्र्वास घेत होते. अशा अवस्थेत जखमी लोभे यांना निलंगा येथील डॉ. अरविंद भातांब्रे यांच्या साई क्रिटिकेअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी डॉ अरविंद भातांब्रे यांनी त्यांच्यावर तातडीने प्राथमिक उपचार करून त्यांना स्वतः म्बुलन्स मध्ये उपचार देत लातूर येथे खाजगी रुग्णालयात दाखल केले. लातूर येथील तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने त्यांनी जखमी लोभेवर उपचार करून त्यांचा जीव वाचवला. मृत्यूशी झुंज देणाऱ्या जखमी लोभेवर उपचार करून त्यांना जीवदान दिल्याबद्दल डॉ अरविंद भातांब्रे यांचे ऋण फेडण्यासाठी आज समस्त उमरगा येथील गावकरी एकवटले आणि हनुमान मंदिराच्या साक्षीने कृतज्ञतेचा एक अनोखा सोहळा संपन्न झाला..

. हनुमान मंदिर, वाडी, उमरगा येथे हा भावपूर्ण सोहळा पार पडला. डॉ. भातांब्रे यांचे मंदिरात आगमन होताच ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी लोभे कुटुंबातील महिलांनी डॉ. भातांब्रे यांचे औक्षण करून त्यांच्याप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना डॉ. भातांब्रे भावूक झाले. ते म्हणाले, मी माझे कर्तव्य केले. कोणताही डॉक्टर हीच तत्परता दाखवेल. पण उमरगा गावाने जे प्रेम दिले, ते मी कधीच विसरू शकणार नाही. हा सत्कार माझा नसून प्रत्येक डॉक्टरच्या सेवाभावाचा आहे.

या प्रसंगी डॉ. भातांब्रे यांनीही मोठ्या मनाचा परिचय देत सौ. लोभे ताई व श्री. जगदीश लोभे यांचा साडी-चोळी व शाल-श्रीफळ देऊन भर आहेराने सन्मान केला. संकटसमयी धीर न सोडणाऱ्या लोभे कुटुंबाचे कौतुक करून त्यांनी समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला. त्यांच्या या कृतीने उपस्थितांची मने जिंकली.

या वेळी लांबोटा जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी श्री. प्रमोदजी मरूरे, पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी श्री. परमेश्र्वर शिंदे, माजी पंचायत समिती सदस्य श्री. महेशजी देशमुख, उपसरपंच श्री. चक्रधरजी शेळके, महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री. महादेवजी आवाळे, सरपंच अमोलजी बिराजदार, चेअरमन आत्माराम लोभे, तंटामुक्त समिती अध्यक्ष श्री. माधवजी लोभे, श्री. पंडितजी रणखांब, श्री. रमेशजी लोभे,श्री. योगेश्जी मुळे,श्री.श्रीधरजी लोभे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला-पुरुष, तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

'केस' न बघता 'माणूस' बघणाऱ्या डॉक्टरांच्या सन्मानासाठी संपूर्ण मंदिर परिसर गजबजला होता. सत्कार सोहळ्याने समाजात डॉक्टरांप्रती असलेला विश्र्वास व माणुसकीचा संदेश अधिक दृढ झाला

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : वंचित बहुजन आघाडी लातूर जिल्हा व युवक जिल्हा आघाडीच्या वतीने पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी जिल्हा सचिव प्रा. प्रशांत उघाडे यांनी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. प्रसंगी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष नितीन गायकवाड, प्रा. कल्याण कांबळे, जिल्हा प्रवक्ते प्रा. चक्षुपाल कांबळे, बाबुराव गायकवाड, राजेंद्र सोनकांबळे, संतोष धायगुडे, भास्कर मस्के, बळीभाऊ सोनवणे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उदगीरसाठी ४०० कोटींच्या ४ - लेन रिंग रोड ला मंजुरी
## माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्या प्रयत्नांना यश



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १ जून : उदगीर शहराच्या वाहतूक व्यवस्थेला गती देणारा आणि शहराच्या विकासाला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असून उदगीरसाठी सुमारे ४०० कोटी रुपये खर्चाच्या ४-लेन रिंगरोड प्रकल्पास मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पासाठी माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असल्याने उदगीर शहर व परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

उदगीर शहरातून दररोज मोठ्या प्रमाणात अवजड व हलक्या वाहनांची वाहतूक होत असते. शहरातील वाढती लोकसंख्या, व्यापारी उलाढाल आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या वाहनांमुळे वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत होता. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडी, अपघातांची शक्यता आणि नागरिकांना होणारा त्रास यामध्ये वाढ झाली होती. ही समस्या लक्षात घेऊन आमदार संजय बनसोडे यांनी मागील अनेक वर्षापासुन शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून उदगीरसाठी स्वतंत्र ४-लेन रिंगरोडची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश मिळाले आहे.

मंजूर झालेल्या या रिंगरोडमुळे शहराबाहेरील वाहतूक शहरात न येता थेट आपल्या मार्गाने पुढे जाऊ शकेल. यामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून प्रवास अधिक सुरक्षित आणि जलद होणार आहे. तसेच औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी विकासाला चालना मिळून उदगीर शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

या प्रकल्पामुळे शहराच्या विविध भागांना अधिक चांगली जोडणी मिळणार असून भविष्यातील वाहतूकीची गरज लक्षात घेऊन सदर रिंगरोड उदगीरच्या विकासाचा नवा अध्याय ठरेल, असा विश्र्वास व्यक्त केला जात आहे.

रिंग रोडच्या दोन्ही बाजूंना भविष्यात व्यावसायिक संकुले, औद्योगिक प्रकल्प आणि विविध विकासकामांना गती मिळण्याची शक्यता आहे.

उदगीर शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी रिंगरोड अत्यंत आवश्यक होता. नागरिकांची मागणी आणि भविष्यातील गरज लक्षात घेऊन शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. शासनाने या मागणीची दखल घेत ४०० कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास मंजुरी दिली असून यामुळे उदगीरच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे.

या निर्णयाबद्दल उदगीर व परिसरातील नागरिक, व्यापारी, वाहनधारक आणि विविध सामाजिक संघटनांनी समाधान व्यक्त करत आमदार संजय बनसोडे यांच्या प्रयत्नांचे स्वागत केले आहे. शहराच्या पायाभूत सुविधांच्या विकासाच्या दृष्टीने हा निर्णय ऐतिहासिक ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

सदर रिंगरोड मंजुर केल्याने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, उदगीरचे सुपुत्र अमोल पाटील कौळखेडकर यांचे आ.संजय बनसोडे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

### पावसाळ्यापूर्वीच वसुंधरा प्रतिष्ठानची पर्यावरण जनजागृती मोहीम । 'एक व्यक्ती-एक झाड'चा प्रभावी संदेश

# उन्हाळ्यात वाहनांसाठी जागा शोधली, आता पावसाळ्यात झाडांसाठी जागा शोधा !

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : वाढते तापमान, घटणारी हरित संपदा आणि बदलते पर्यावरणीय संतुलन याबाबत समाजात जागृती निर्माण करण्यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान, लातूर यांनी पावसाळ्यापूर्वीच व्यापक जनजागृती मोहीम सुरू केली आहे. 'उन्हाळ्यात गाडी लावण्यासाठी जागा शोधत होतात ना? मग आता पावसाळ्यात झाडे लावण्यासाठी जागा शोधा' असा थेट आणि विचार करायला लावणारा संदेश असलेले आकर्षक फलक शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि गर्दीच्या ठिकाणी लावण्यात आले आहेत.

या फलकांद्वारे 'एक व्यक्ती-एक झाड' ही संकल्पना प्रभावीपणे मांडण्यात आली असून वृक्षलागवड आणि संगोपन ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.



वड, कडुलिंब, गुलमोहर, बहावा, जांभूळ, आंबा, पारिजात व आवळा यांसारख्या पर्यावरणपूरक वृक्षांची माहिती देत त्यांचे सामाजिक, पर्यावरणीय व आरोग्यदायी महत्त्वही जनतेसमोर मांडण्यात आले आहे. वाढते प्रदूषण, भूजल पातळीतील घट, उष्णतेच्या लाटा आणि पर्यावरणीय असमतोलाच्या पार्श्र्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, हा संदेश प्रतिष्ठानच्या या मोहिमेवून दिला जात आहे.

विशेष म्हणजे पावसाळा सुरू होण्यापूर्वीच वृक्षलागवडीसाठी अनुकूल वातावरण तयार करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून येत आ हे. वसुंधरा प्रतिष्ठानने उभारलेल्या या जनजागृती फलकांमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक चर्चा सुरू झाली असून पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला नवी दिशा मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे. सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घेणाऱ्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे, अशी माहिती या प्रतिष्ठानचे प्रा. योगेश शर्मा यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जायकवाडी धरणात दोघांचा तर गोदावरीत बुडून एकाचा मृत्यू


तभा वृत्तसेवा

**पैठण दि १ ::** पैठण येथील गोदावरी नदीपात्रात पाण्यात बुडाल्याने १७ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (ता. ३०) दुपारी घडली होती .

अधिराज रमेश शिंदे (वय १७, रा. शेणपुंजी रांजनगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) असे या युवकाचे नाव होते तर नाथसागर धरणाच्या पाण्यात पोहण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या दोन तरुणाचा रविवारी दि.३१ रोजी पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.दोन दिवसात लागोपाठ या घटना घडल्याने पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.

नाथसागर धरणात घटना घडल्याच्या काही तासाने पैठण पोलीस ,अग्निशामक दल व युवकाच्या पथकाने पाण्यामध्ये शोध कार्य करून संकेत सिद्धार्थ खरात वय १८ वर्ष याचा मृतदेह पाण्याबाहेर काढला होता. परंतु यावेळी बुडालेल्या दुसऱ्या तरुणाचा मृतदेह शोध कार्य चालू असताना अंधार पडल्यामुळे





शोध मोहीम थांबविण्यात आली होती. सोमवार दि.१ जून रोजी सकाळी पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, सपोनि चंद्रकांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग, बीट जमादार राजेंद्र जिवडे, पालवे, चव्हाण व नगरपरिषद अग्निशमन दलाचे जवान पथकातील अमोल शेजुळ,जब्बी धांडे,अनिल गायकवाड,

ईश्वर मिसाळ,आकाश जगधने,रफीक धांडे,जफर शेख,शुभम रुपेकर,सुधीर नलभे यांच्या मदतीने शोध मोहीम सुरू करण्यात आली. यावेळी पाण्यामध्ये नऊ वाजेच्या दरम्यान शोध कार्य करताना पाण्यात बुडालेला दुसरा तरुण अनिकेत मनू भारती वय १९ वर्ष रा. अंबिकानगर गल्ली क्रमांक ७ मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर याचे मृतदेह आढळून आला. सदरील तरुणाचा मृतदेह पैठण येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन नेण्यात आला. या तरुणाचे नातेवाईक रात्रीपासूनच नाथसागर धरणावर दाखल होऊन आक्रोश करीत होते.

## वंशिका अनिल कांबळे हिची दहाव्या साउथ एशियन आट्यापाट्या फेडरेशन कपसाठी निवड

तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि १ जून :** दि. 2 ते ४ जून रोजी भूतान येथे होत असलेल्या साऊथ एशिया आट्यापाट्या फेडरेशन कप साठीभारतीय महिला संघात कु. वंशिका अनिल कांबळे हिची निवड झाली आहे .ती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी क्रीडा संचालक डॉक्टर दयानंद कांबळे ,शहादा येथील पूज्य साने गुरुजी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉक्टर अरविंद कांबळे, महाराष्ट्र पोलीस मिलिंद कांबळे ,सुनील कांबळे, प्राध्यापक डॉक्टर राहुल कांबळे क्रीडा शिक्षक सिद्धार्थ कांबळे यांची पुतणी असून प्राध्यापिका डॉक्टर उज्वला व श्री सरस्वती भुवन प्रशाला,बिडकीन येथील क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत असलेले व कराटेच्या माध्यमातून प्रसिद्ध असलेले मास्टर अनिल कांबळे यांची कन्या आहे .वंशिका कांबळे हिने आजपर्यंत आठ राज्य पातळी व सहा राष्ट्रीय पातळीवर विविध पदके प्राप्त केले असून ती गेल्या आठ वर्षापासून या खेळामध्ये आपले कौशल्य दाखवित आहे.



२०२६ ची साउथ एशिया आट्यापाट्या फेडरेशन कप भूतान येथे होत आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणारी ही छत्रपती संभाजी नगर आट्यापाट्या संघटनेतील पहिली आणि कांबळे परिवारातील एकमेव महिला खेळाडू आहे .वंशिकाने पूर्णा परभणी व छ संभाजी नगर चे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले आहे .तिच्या या निवडीबद्दल श्री .सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दिनेश वकील ,सरचिटणीस डॉ.श्रीरंग देशपांडे, माजी अध्यक्ष राम भोगले, डॉ.रश्मीताई बोरीकर ,भंते डॉ.उपगुप्त महाथेरो ,आमदार डॉ.राहुल पाटील ,आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे , छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ,प्राचार्य विश्वरूप निकुंभ ,प्राचार्य धर्मेंद्र येवले प्राचार्य सुनील पाडळकर , प्राचार्य राजेंद्र गायकवाड ,प्राचार्य राजेंद्र कोठावदे , महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अनिल पाडळकर ,डॉक्टर धनंजय वडमारे ,डॉक्टर प्रवीण खरात , ॲड कपिल शिंदे, युवानेते संजय सारणीकर ,कपिल भाई खरात ,बांधकाम व्यवसाय सचिन धांडे , कुणाल कदम ,किरण उबाळे ,गुरमीत सिंग गिल,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ क्रीडा संचालक सचिन देशमुख डॉ,शेख अफसर शेख रशीद , पी इ एस अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य अभिजीत वाडेकर ,डॉक्टर नंदकिशोर खिल्लारे., सुभाष गवई ,ज्ञानेश्वर चाटूपळे ,सतीश इंगळे आट्यापाट्या खेळाचे मुख्य प्रशिक्षक धर्मेंद्र काळे, प्रशिक्षक शुभम गायकवाड ,अनिल मोठे , प्राध्यापक डॉक्टर अनिल गवळे ,पत्रकार जगदीश जोगदंड प्राध्यापक डॉक्टर भुताळे आदींनी अभिनंदन केले असून तिच्यावर मराठवाड्यातून विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## मनपातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

### कोकणवाडी चौकातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती शनिवारी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. समाजकल्याण, न्यायप्रिय राज्यकारभार आणि लोकहिताच्या कार्यामुळे इतिहासात अजरामर ठरलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना यावेळी अभिवादन करण्यात आले.



अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्श राज्यकारभाराची आठवण करून दिली.

कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, महिला व बालकल्याण समिती सभापती शोभा बुरांडे, सदस्य अभिजीत जीवनवाल, राजू राजपूत, नगरसेविका किर्ती शिंदे, अर्चना नीलकंठ,

कोकणवाडी चौक येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी छाया वाघचौरे, छाया खोजकर तसेच अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत इंटरनेट बँकिंगचा शुभारंभ

**कल्याण :** रविवार रोजी, पाटीदार भवन, कल्याण शीळ रोड, डोंबिवली (पूर्व) येथे डोंबिवली नागरी सहकारी बँकेची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

या सभेस बँकेचे सर्व माननीय संचालक, माजी संचालक, माननीय सभासद, वरिष्ठ अधिकारी वर्ग, शाखा व्यवस्थापक आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. बँकेचे माननीय अध्यक्ष ॲड श्री गणेश धारगळकर हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. सभेमध्ये आर्थिक वर्ष २०२५-२६ या कालावधीतील बँकेच्या उल्लेखनीय प्रगतीचा आलेख सभेपुढे मांडण्यात आला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. ॲड. श्री गणेश धारगळकर यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षातील बँकेच्या उपलब्धीचा आढावा घेतला. २०२५ – २६ या आर्थिक वर्षात, बँकेचा निव्वळ नफा रु. ४२.९५ कोटी एवढा झाला असून, ठेवी व कर्जवाटपात गतवर्षीच्या तुलनेत अधिक चांगली वाढ झालेली आहे. आर्थिक वर्षात




बँकेकडील ठेवी रु.४४२६/- कोटींवर पोहचल्या असून, कर्ज व्यवहार रु.२६७५/- कोटींपर्यंत पोहोचला आहे. बँकेच्या एकूण व्यवसायात मागील वर्षापेक्षा तब्बल रु.७३६/- कोटींची भरीव वाढ झाली असून , आर्थिक वर्षा अखेरीस

रु .७१०१/- कोटी एवढा मिश्र व्यवसाय झाला. आर्थिक वर्षात बँकेने राबवलेल्या विविध सामाजिक उपक्रमांद्वारे ग्राहकांशी चांगला संपर्क झाला तसेच अनेक नवीन ग्राहकांना बँकेशी जोडता आले.

बँकेने यावर्षी युद्धजन्य परिस्थिती उद्भवली असताना देखील सर्वच आघाड्यांवर वाढ नोंदवून आर्थिक वर्ष २०२६ अखेरीस ढोबळ अनुत्पादित कर्जाचे (ग्रॉस NPA) प्रमाण केवळ १.०९% व नक्त अनुत्पादित कर्ज (नेट NPA) ०.००% राखण्यात यश आले. आर्थिक वर्षात बँकेला महाराष्ट्र अर्बन को- ऑपरेटीव बँक्स फेडरेशन " चा आर्थिक वर्ष २०२४-२५ करीताचा २५००/- ते ५०००/- कोटी ठेवींच्या गटातून सर्वोत्कृष्ट बँक हा पुरस्कार सलग तिसऱ्या वर्षी मिळाला.

**ANGEL ONE LIMITED**

Regd. Off: 601, 6th Floor, ACKRUTI STAR, CENTRAL ROAD, MIDC, ANDHERI EAST, MUMBAI -400093
Centralized desk : 18001020 Email id : support@angelone.in
Member of : NSE / BSE / BSE REMISIER / MCX / MCX SX / NCDEX
Member IDs: NSE : 12798, BSE : 612, MCX : 12685,
NCDEX : 00220 SEBI Registration No: INZ000161534

**NOTICE**

This is to inform all concerned that we have initiated the process of cancellation of registration of our below mentioned Authorised Person (AP) due to regulatory reasons/concerns.

| Name Of Authorised Person | Trade Name of AP | Address of AP | AP Registration No. |
|---|---|---|---|
| SUSHMA ARJUN KALE | SUSHMA ARJUN KALE | RAMLING NAGAR, YEDSI, YEDSHI RAMLING NAGAR OSMANABAD-413405 MAHARASHTRA | NSE : AP0397264251 |

Any person dealing with the above-mentioned Authorised Person henceforth shall do so at their own risk. **ANGEL ONE LTD.** shall not be liable for any dealings with the said entity post the issuance of this notice. Investors having any queries or concerns regarding this matter are requested to contact **ANGEL ONE LTD.** within **15 days** from the date of issuing this notice.

Date : 02.06.2026
Place : Maharashtra

For ANGEL ONE LTD
Sd/-,
Authorised Signatory

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of the Election : Maharashtra Legislative Council from Nanded Local Authorities Constituency**
**Name of State/UT : Maharashtra**
**(1) Name of the Constituency : Nanded Local Authorities Constituency**
**Name of the candidate : AMARNATH ANANTRAO RAJURKAR**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | Criminal antecedents | | |
| | a. | Nature of the offences | Nil |
| | b. | Case no. | Nil |
| | c. | Name of the Court | Nil |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | Nil |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate **AMARNATH ANANTRAO RAJURKAR** is very Senior Party Worker & also Ex. MLC. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : Nanded Local Authorities Constituency**
**Name of the candidate : AMARNATH ANANTRAO RAJURKAR** ...................................................... and so on

* In the case of election to Council of States or States or election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Date : 31/05/2026**
**Place : Mumbai**

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of the Election : Maharashtra Legislative Council from Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**
**Name of State/UT : Maharashtra**
**(1) Name of the Constituency : Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**
**Name of the candidate : SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | Criminal antecedents | | |
| | a. | Nature of the offences | Nil |
| | b. | Case no. | Nil |
| | c. | Name of the Court | Nil |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | Nil |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate **SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH** is very Senior Party Worker. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**
**Name of the candidate : SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH** ...................................................... and so on

* In the case of election to Council of States or States or election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Date : 31/05/2026**
**Place : Mumbai**